# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | १ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६४**

MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तिसरे / अंक १ / डिसेंबर २००१

## संपादकीय

## ‘पहा विचार करून’

‘‘सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळातही जगातील इतर देशांच्या तुलनेमध्ये आपण आपली संस्कृती टिकविलीआहे.’’ असे उद्‌गार एका जुन्या भाषणात एक साहित्यिकाने काढले होते, त्यांची आठवण झाली ती आपला देशाची नेमकी संस्कृती कोणती, भारतीय संस्कृती म्हणतात, साने गुरूजी, पांडुरंग शास्त्री आठवले आदी विचारवंतांनी आग्रहाने जिचे प्रतिपादन केले ती आपली संस्कृती की...?

विचार आला तो तुळशीच्या लग्नाच्या निमित्ताने. छोटी छोटी मुले अनेक प्रश्न घेऊनच वावरत असतात. एक पाचवी-सहावीतला मुलग ब्रसमध्ये सांगत होता, ‘‘अरे आमच्या सोसायटीत तुळशीच्या लग्नाची पार्टी आहे. अगदी व्हेज-नॉन व्हेज सर्व. पण बुफे आहे बरं का, तू आई-बाबांना घेऊन ये.’’ त्यावर दुसऱ्या भारतीय मुलाने विचारले, ‘‘तुळशीचं कशाला लग्न? आणि कोणत्या हॉलमध्ये आहे?’’

हे व असे लहान मुलांमधले संवाद वेळी-अवेळी कान उघडे ठेवले तर ऐकायला येतात, प्रश्नांचा भोवरा अधिक गतिमान होतो आणि आगतिकही होतो. एकीकडे संस्कृती विद्रुप करणारे शहरी बकालपण. या बकालपणात संस्कृतीची विकृती करणाऱ्या परंपरा आणि दुसरीकडे वाढतच जाणारी गर्दी. या सर्वांत आणखी दहा-पंधरा वर्षांनंतर कोणती संस्कृती भारतीय म्हणून टिकणार आहे? भोगवाद, चंगळवाद, इंग्रजी माध्यमाचा चुकीचा अर्थ उच्च वर्गीय वा उच्च मध्यम वर्गीय म्हणविणाल्या जाणाऱ्या जीवनातील बदलत्या संकल्पना हे सर्व पाहिलं की आपण ज्या संक्रमणावस्थेतून जात आहोत, तिला भविष्यच नाही,असं वाटत रहातं.

ज्या देशाला उज्ज्वल इतिहास आहे, ज्या देशाच्या सांस्कृतिक परंपरांना खूप गहन अर्थ आहे, त्या आपल देशात दिसणारं, विशेषत: शहरीकरणामुळे दिसणारं चित्र आशादायी नाही. कॉन्व्हेंटमध्ये जाणारी मराठी आडनावाची मुलं ‘‘See that guy is speaking in गावठी लँग्वेज’’ असं म्हणून मराठी बोलणारांची टिंगल करतात, हसतात व त्यांचे ममा डॅडीही त्यांना प्रोत्साहन देतात !

गुरुवर्य रु.वि. कुलकर्णींकडे मध्यांतरी गेलो होतो तेव्हा त्यांच्या बोलण्यातही हीच काळजी जाणवली. बहुसंस्कृतीवाद, इतरांची भ्रष्ट नक्कल यातून आम्ही काय साधणार आहोत ? पहा,विचार करून !

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष तिसरे / अंक १ / डिसेंबर २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नायजेरिया : अस्मितेच्या शोधात असलेला देश | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | रम्य संध्याकाळ - ज्ञानमंदिराच्या सहवासात | श्री. मंदार मुळ्ये | ६ |
| ३) | बातचीत - मयुर घाटणेकर | श्री. गीतेश जोशी | ९ |
| ५) | श्रीमद्भगवत् गीता (अध्याय ९ वा) ॥ राजविद्याराजगुह्ययोगः ॥ | श्रीमती आशा भिडे | ११ |
| ६) | खाड्या, नदीमुखे व तिवरे - प्रदूषण व संवर्धन | डॉ. र. प्र. आठल्ये | २० |
| ७) | श्रीमद्भगवत् गीता - विषय प्रवेश | श्री. शं.बा.मठ | २४ |
| ८) | 'श्री रामचरित मानस' - एक अद्वितीय ग्रंथ | प्रा. सी.श्री. मुजुमदार | २९ |
| ९) | श्री विठ्ठल : पुंडरिकमुनी मनमुकुंद विकास सुधारक | श्री. श.गो.धोपाटे | ३२ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# नायजेरिया : अस्मितेच्या शोधात असलेला देश

*नायजेरियाला STANच्या निमित्ताने गेलले डॉ. आगरकर व त्यांचे सह भारतीय प्रतिनिधी यांना नायजेरियाबद्दल जाणवलेले विचार या लेखात आहेत. - संपादक*

नायजेरियातील विज्ञान शिक्षकांची एक राष्ट्रव्यापी संघटना आहे. सायन्स टिचर्स असोशिएन ऑफ नायजेरिया असे त्या संघटनेचे नाव. संक्षिप्तरूपात स्टॅन (STAN) असा या संस्थेचा उल्लेख करतात. स्टॅनच्या वतीने दरवर्षी विज्ञान शिक्षकांचे राष्ट्रव्यापी अधिवेशन भरविण्यात येते. आजतागायत अशी ४३ अधिवेशने आयोजित करण्यात आली आहेत. स्टॅनचे ४३ वे अधिवेशन पोर्ट हरकोर्ट (Port Harcourt ) या शहरात ऑगस्ट २००२ मध्ये भरवण्यात आले होते. या अधिवेशनाला हजर राहण्याच्या निमित्ताने नायजेरियाला जाण्याचा योग आला.

नायजेरियात जाण्यापूर्वी त्या देशासंबंधी माहिती मिळवण्याच्या आम्ही प्रयत्न केला. ज्यांच्या ज्यांच्याकडे आम्ही चौकशी केली त्या सर्वांनी देश अतिशय असुरक्षित असल्याचे सांगितले. हॉटेलच्या खोलीतून बिल्कुल बाहेर पडू नका, बाहेर पडावेच लागलेच तर सरळ गाडीतच पाय ठेवा, वाटेने बिल्कुल फिरू नका, फिरायची गरज पडलीच तर स्थानिक व्यक्तीला सोबत घेऊन जा. रस्त्यात पाकिटमार, लुटारू लोक यांचा सुळसुळाट असतो. त्यांच्यापासून जीवाला धोका असतो. सांभाळून राहा, असा सल्ला सहकाऱ्यांनी आम्हाला दिला. काही हितचिंतकांनी तर नायजेरियाला जाणेच रद्द करा असाही सल्ला दिला. भारतीय मंडळींना जरा अतिशयोक्ती करायची सवयच असते म्हणून लेखी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. तिथेही तेच चित्र. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल या जर्मनीतील स्वयंसेवी संघटनेने प्रसिद्ध केलेला अहवाल वाचण्यात आला. या संस्थेने १३२ देशांमध्ये सर्वेक्षण करून भ्रष्टाचारामध्ये कोणत्या देशाचा क्रमांक लागतो ते प्रसिद्ध केले. भ्रष्टाचारामध्ये सर्वात वरचा क्रमांक आहे बांगलादेशाचा. त्याखालोखाल क्रमांक आहे नायजेरियाचा. याचा अर्थ आम्ही केवळ असुरक्षितच नव्हे तर अतिभ्रष्ट देशात जात होतो. त्यामुळे आम्ही सुरक्षितपणे परत येऊ की नाही याची आम्हला धाकधूकच वाटत होती; भीतभीतच आम्ही लागोसच्या विमानतळावर पाऊल ठेवले.

भारतातून आम्ही तिघेजण स्टॅनच्या अधिवेशनाला गेलो होतो. तिघांनीही एकत्रित राहायचे असे आम्ही आधीच ठरवले होते. नायजेरियातील भ्रष्टाचाराचा दणका तुम्हाला विमातळावरच येईल, असे आम्हाला सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात अनुभव वेगळाच आला. इमिग्रेशन, कस्टम्स या तांत्रिक बाबी चुटकीसरशी आटोपल्या. भारतात यापेक्षा जास्त वेळ लागतो. सामानही लवकरच मिळाले. आम्ही बाहेर पडतो न पडता तोच स्टॅन नावाचे फलक घेतलेला एक माणूस आणि आमच्या नावाचा फलक घेतलेला दुसरा माणूस आमच्या नजरेस पडला. त्या दोघांनी आम्हाला लागोसच्या एका हॉटेलात नेले. एका दिवसासाठी आमचा मुक्काम लागोसमध्ये होता. दुपारी आम्ही हॉटेलात पोहोचलो होतो. उद्या सकाळी आम्ही येतो, असे सांगून ते दोघे निघून गेले. नवीन ठिकाणी फेरफटका मारून आजूबाजूचा परिसर बघावा, असे आमच्या मनात आले. परंतु मित्राचा सल्ला आठवला. खात्री करून घेण्यासाठी म्हणून हॉटेलच्या मॅनेजरकडे चौकशी केली. त्यानेही 'स्थानिक व्यक्ती सोबत नसेल तर बाहेर जाऊ नका', असाच सल्ला दिला. मित्रांचा आणि मॅनेजरचा सल्ला धुडकावून आम्ही शहरात फेरफटका मारायचे ठरवले.

'वाटला होता बागुलबुवा हा तर सांताक्लॉस', असे आमचे मत झाले. ज्या हॉटेलमध्ये आम्ही राहात होतो तिथेच एक विवाह समारंभ चालू होता. त्या

विवाहसंभारंभाला हजर राहण्यासाठी अनेक स्त्री-पुरुष पारंपरिक वेशात उपस्थित होते. पायजामा, पायघोळ कुरता आणि अंगभर उपरणे असा बहुतेकांचा गणवेश होता. काही लोक सुटाबुटात होते. परंतु पारंपरिक वेशात असलेले लोक नजरेत भरत होते. त्यांचे कपडेही विविध रंगाचे होते. मोठ्या संख्येने लोक तेथे येत असल्याने किरकोळ विक्रेत्यांची गर्दी होती. कोणी माळा विकत होते, तर कोणी टोप्या. आमच्याकडेही अनेकांनी मोर्चा वळविला. परंतु आम्ही लगेच त्यांची बोळवण केली.

लॉगोसच्या रस्त्यावरून फिरताना आपल्याला जुन्या दिल्लीची आठवण होते. फुटपाथवरची लहान-मोठी दुकाने, त्याच्या पुढे उभी राहून खरेदी करणारी माणसे यांच्यामधून वाट काढताना नाकी नऊ येतात. देशातील दारिद्र्य सहज नजरेत भरते. अनेक स्त्रिया रस्त्यावर लहान-सहान व्यवसाय करताना आढळतात. कोणी कारपेटचे तुकडे घेऊन बसलेल्या असतात तर कोणी डोक्याला बांधायचे मुंडासे घेऊन बसलेल्या असतात. कोणी मका भाजून विकायला बसलेल्या असतात तर कोणी तेलात वड्यासारखा पदार्थ तळत असतात. रस्त्यावरचे पदार्थ खाऊ नयेत असे आम्हाला लहानपणापासून सांगण्यात आले. तरीही आम्ही भाजलेला मका खायचे ठरवले. भाजलेल्या मक्याची किंमत ३० नायरा असे तिथल्या बाईने सांगितले. आमच्या सवयीनुसार आम्ही ५० नायऱ्याला दोन असा भाव केला. तो तिने लगेच मान्य केला. १ रुपयाला साधारणपणे तीन नायरा मिळतात. त्यादृष्टीने विचार केला तर आम्ही घेतलेला मका फार महाग नव्हता. चवीला तर तो उत्कृष्टच होता.

नायजेरियावर इंग्रजांचे राज्य होते. इतर वसाहतीप्रमाणे इथेही इंग्रजांनी वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. आपली भाषा आणि आपली संस्कृती याचा प्रसार केला. आज इंग्रजी ही नायजेरियाची सर्वमान्य भाषा झाली आहे. लागोस आणि पोर्ट हरकोर्ट या दोन्ही शहरामध्ये स्थानिक भाषेचा वापर होताना आम्ही कधीच पाहिले नाही. अगदी दूरवर दऱ्याखोऱ्यात काही टोळ्या त्यांची भाषा वापरत असतील. परंतु ज्यांना आपण सुशिक्षित म्हणतो, अशी सगळी मंडळी इंग्रजीतूनच संभाषण करीत होती. दोन मोटार चालक एकत्र आले तरी त्यांच्यातील संभाषणाची भाषा इंग्रजीच. स्वत्व हरपलेला हा देश आहे असेच आमचे मत झाले.

साडेतीन दशकापूर्वी म्हणजे १९६५ साली नायजेरियाला स्वातंत्र्य मिळाले. तोपर्यंत अमेरिका महासत्ता म्हणून उदयास आली. अमेरिकेची नक्कल करण्यात अनेक देश धन्यता मानू लागले. त्या मोहाला नायजेरिया बळी पडला नसता तरच नवल. इंग्रजांच्या प्रभावाने नायजेरियात पूर्वी वाहतूक डाव्या बाजून होत असे. खास नियम करून उजव्या बाजून वाहतूक करण्याची सक्ती करण्यात आली. या बदलामुळे डाव्या बाजूचा चालक असलेली वाहने बिनदिक्कतपणे वापरता येऊ लागली. अमेरिका, जर्मनी, डेन्मार्क अशा प्रगत राष्ट्रांमध्ये नको असलेली वाहने आता नायजेरियात खपू लागली. त्यामुळे जुन्या वाहनांना मोठी बाजारपेठ मिळाली. पेट्रोल स्वस्त असल्याने वाहन चालवणे फारसे खर्चिक नाही. साधारणपणे १ रुपयाला एक लिटर पेट्रोल मिळते. एक लिटर मिनरल वॉटर (बाटलीबंद पाणी) हवे असेल तर मात्र २५ रुपये मोजावे लागतात. एक कप चहादेखील एक लिटर पेट्रोलपेक्षा महाग पडतो. याचे कारण नायजेरियात मोठ्या प्रमाणावर खनिज तेल उपलब्ध आहे. खनिज तेलाची निर्यात हे नायजेरियाचे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे.

खनिज तेल आणि लाकूड एवढेच नायजेरिया निर्यात करू शकते. बाकी सर्व वस्तू त्यांना आयातच कराव्या लागतात. रस्त्यावर असलेली सर्व वाहने आयात केलेली. त्यांचे सुटे भागदेखील त्यांना आयात करावे लागतात. भारतातील रस्त्यावर धावणारी बहुसंख्य वाहन भारतात बनलेली असतात, यावर त्यांचा विश्वासच बसेना. परत गेल्यावर मित्रांना भेटी देता याव्यात म्हणून पेन खरेदी करायला आम्ही गेलो तर आमच्या हातात लागलं भारतीय बनावटीचं पेन. हॉटेलमध्ये देण्यात येणारे काटे-चमचे देखील आयात केलेले. त्यातील काही भारतात बनवलेले

तर काही चीनमध्ये बनवलेले होते. स्टॅनच्या वतीने अधिवेशनात सहभागी झालेल्या सभासदांना एकेक छत्री देण्यात आली तीदेखील जपानमध्ये बनवलेली. नायजेरियाची आठवण म्हणून कप घ्यायला गेलो तर त्यावर लिहिलेले होते इंग्लंडची निर्मिती (Made in England ).

नायजेरियातील कापड व्यवसाय मात्र अजून तग धरून आहे. गालिचे, रंगीबेरंगी वस्त्रप्रावरणे इथे बनवली जातात. देशात काही ठिकाणी कापडाच्या गिरण्या असल्याचे सांगण्यात आले. त्यात काम करणारे उच्चपदस्थ आणि तंत्रज्ञ मात्र परदेशातील असल्याची त्यांना खंत वाटते. त्या स्तरापर्यंत आमची युवापिढी लवकरच पोहोचेल, असा विश्वासही त्यांना वाटतो. परंतु युवापिढी मात्र त्यादृष्टीने विचार करताना दिसत नाही. स्टॅनचे अधिवेशन एका विद्यापीठातच भरवण्यात आले होते. पोर्ट हरकोर्ट ही रिव्हर्स स्टेट राज्याची राजधानी. रिव्हर्स स्टेटचे विज्ञान तंत्रज्ञान विद्यापीठ पोर्ट हरकोर्ट या राजधानीच्या शहरात आहे. हे विद्यापीठ प्रशस्त असून तेथे विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे शिक्षण देणारे अनेक विभाग आहेत. अधिवेशनकाळात विद्यापीठाचे वर्गही चालू होते. ही संधी साधून आम्ही काही विद्यार्थ्यांशी बोलण्याचा प्रयत्न केला. त्यातील बरेचसे विद्यार्थी पश्चिमेकडे म्हणजे अमेरिकेकडे डोळे लावून बसलेले आहेत. कधी शिक्षण संपते आणि कधी अमेरिकेला जातो असे त्यांना झाले आहे. आत्तापासूनच ते अमेरिकन लोकांचे हावभाव, त्यांचे शब्दोच्चार याची नक्कल करू लागले आहेत. अमेरिकेत विद्यापीठातील मुक्त वातावरणाचा प्रभाव येथेही जाणवतो. आपले शरीर उघडे टाकायला इथल्या मुलींना काहीच वाटत नाही. कमीतकमी कपडे अंगावर घालून आपले फोटो काढून घेण्यात या मुलींना धन्यता वाटते. या फोटोंचे ते काय करीत असतील देव जाणे. परंतु विद्यापीठाच्या लॉनवर फोटोसेशन सतत चाललेले असतात. यातील फोटो काढणारे लोक व्यावसायिक असतात. मुलीला दूर उभे करून टेलीलेन्सच्या मदतीने ते फोटो काढतात.

पोर्ट हरकोर्टमध्ये प्रवेश केल्याबरोबर पणजीत आल्यासारखे वाटते. समुद्र जवळ असल्याने वातावरणात दमटपणा जाणवतो. सर्वत्र ताड आणि माडाची झाडे आढळतात. नारळाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर. पण कुठेही शहाळ्याचे पाणी मिळत नाही की जेवणात खोबऱ्याचा उपयोग केला जात नाही. खोबऱ्यापासून तेल काढतात त्याचा उपयोग अन्नात केला जातो. जेवणात मसाल्यांचा उपयोग कमीच. आंतरराष्ट्रीय पाहुण्यांना तर पाश्चिमात्य पद्धतीचे बेचव जेवण घालतात; विद्यापीठाच्या कँटीनमध्ये पाश्चिमात्य पद्धतीचे जेवण मिळते. बाटलीबंद पाणी पिण्याची पद्धत कँटीनमध्ये व हॉटेलात सर्वत्र दिसते. घरी मात्र लोक नळाचे पाणी पितात. नळाला येणारे पाणी जरा मचूळ लागते.

''स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची बांधणी करण्यासाठी आम्ही पश्चिमेकडे बघू लागलो. परंतु आमच्या समस्यांची उत्तरे पश्चिमेकडे नसून पूर्वेकडच्या देशात आहेत, हे आम्हाला कळले.'' हे विधान आहे एका नायजेरियन विचारवंताचे. म्हणूनच तर ४३ व्या स्टॅनच्या अधिवेशनातील प्रमुख भाषण देण्याचे निमंत्रण एका भारतीय माणसाला देण्यात आले. भारतात दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना विज्ञान आणि गणित शिकवण्यासाठी काय करतात हे जाणून घेण्याची विचारवंतामध्ये उत्सुकता दिसते. भारताने अल्पावधीत अणुउर्जा, अंतराळविज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे त्यांना कौतुक वाटते. भारताकडून घेण्यासारखे बरेच काही आहे, याची त्यांना जाणीव झाली आहे. भारताने या संधीचा उपयोग करून घेण्याची गरज आहे. भारतीय रस्ते आणि वातावरण याला अनुकूल असलेली वाहने नायजेरियाला लाभदायी ठरतील, तेथे उपलब्ध असलेल्या तेलाचा शोध आणि कच्च्या तेलावर प्रक्रिया या क्षेत्रात भारत महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल. नायजेरियाला आपल्या पायावर उभे राहण्यासाठी भारत नक्कीच मदत करू शकेल असे वाटते.

नायजेरियात नजर टाकली की, एक प्रकारची

(पान क्र. २३ पहा)

# रम्य संध्याकाल - ज्ञान मंदिराच्या सहवासात

*गेल्या महिन्यात झालेला 'ग्रंथालय सप्ताहानिमित्त'ने भिवंडी येथील सार्वजनिक वाचनालयाच्या भेटीवर आधारित*

*- संपादक*

सायंकाळची रम्य वेळ. देवळाच्या गाभाऱ्यातील नंदादीप मंद प्रकाशात अखंडपणे तेवत होते. सूर्यास्त समयीचे तांबूस केशरी हिरण्यगर्भी तेज मावळतीस विखुरले होते. अशा वातावरणांमध्ये मी एका ज्ञानमंदिराच्या पायऱ्या चढत होतो.

वाचनालये (ग्रंथालये) आणि प्रयोगशाळा ही सामाजिक जीवनाची दोन फुफ्फुसे असतात ही उक्ती सार्थ करणारे हे ज्ञानमंदिर म्हणजेच 'अतिशय संवेदनशील' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी येथील सार्वजनिक वाचनालय; वाचनमंदिर, भिवंडी ही संस्था १३९ वर्षे इतकी जुनी आहे. व शतकोत्तर रौप्य महोत्सव १९८८ मध्ये साजरा करून आता शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाकडे ही संस्था वाटचाल करीत आहे. मग ह्या संस्थेची ओळख करून घेण्यात एक वेगळाच आनंद वाटला तर आश्चर्य कसले ?



६ मार्च १८५३ रोजी भिवंडी शहरातील ग्रंथप्रेमी व्यक्तींनी रु. १५०/- जमवून एका भाड्याच्या जागेत हे ग्रंथालय सरू केले. तदनंतर १९३३ मध्ये टिळक मंदिर संस्थान च्या टिळक मंदिरात हे ग्रंथालय सुरू होते. आज हे ग्रंथालय संस्थेच्या हक्काच्या ईमारतीत १९७६ पासून वाचकांच्या सेवेमध्ये कार्यरत आहे.

ह्या ग्रंथालयास तालुका मुक्तद्वार 'अ' वर्ग वाचनालय म्हणून १९५३ साली शासनमान्यता व नोंदणी क्रमांक प्राप्त झाला. महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय अनुदान नियमांनुसार तालुका वाचनालय म्हणुन या संस्थेस वार्षिक रु. १२,८००/- अनुदान देण्यात येते. हे नगराचे सांस्कृतिक वैभव असूनही स्थानिक स्वराज्य संस्थेकडून गेली चार वर्षे अनुदान मिळाले नाही, ही खेदाची बाब आहे.

एकूण तीस हजार पुस्तकांचा संग्रह या ग्रंथालयात पहाण्यास मिळतो. ग्रंथालय व माहितीशास्त्राचे (भारतीय) जनक डॉ. रंगनाथन यांनी विकसित केलेल्या 'Colen Classification' या पद्धतीने ग्रंथसूची आहे व लवकरच संगणकीकृत ग्रंथसूची व सूक्ष्म वर्गीकरण सूची ग्रंथप्रेमींना उपलब्ध होईल. मराठी वाङ्मय, कोश, इतिहास, अर्थशास्त्र इत्यादी विषयांच्या पुस्तकांबरोबरच इंग्रजी, हिन्दी व गुजराती पुस्तकांचेही अनुक्रमे १८००, १५०० व १२०० असे संग्रह उपलब्ध आहेत.

संदर्भ विभाग (Reference Section) हे या सर्वजनिक ग्रंथालयाचे वैशिष्ट्य आहे. हस्तलिखित दुर्मिळ चरित्रे, अर्थशास्त्रविषयक संदर्भ, प्रवासी संदर्भ, साहित्याचे विपुल ग्रंथ ग्रंथालयात आहेत.

ऑक्टोबर २००२ पासून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग सुरू करून या ग्रंथालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे.

वाचकांच्या वयोगटानुसार माफक वर्गणी उदा. बाल वाचक विभागासाठी मासिक रु. ५/-, युवा व प्रौढ वाचकांसाठी मासिक रु. २०/- व मासिकांसाठी रु. २०/- आकारली जाते. रु. २,५००/- देऊन आजीव सभासद होणारे असंख्य ग्रंथप्रेमी या ग्रंथालयाच्या वाचक वर्गात आहेत. आजमितीस ९४४ वाचक या संस्थेचे सभासद आहेत. राजाराम मोहनरॉय प्रतिष्ठान, कोलकाता या संस्थेकडून रु. ५०,०००/- त्याच संस्थेकडून शतकोत्तर रौप्य महोत्सवाप्रीत्यर्थ रु. ५०,०००/- व बालविभागाच्या विकासाकरिता रु. १०,०००/- ग्रंथालयास देण्यात आले आहेत. अनेक दानशूर व्यक्ती धन, पुस्तके व वस्तू रुपाने ग्रंथालयास देणग्या देऊन या ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासाकरिता अप्रत्यक्षपणे कार्यरत असल्याचे दिसून येते. मुक्तद्वार वाचन कक्षाच्या माध्यमातून वर्तमानपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके इ. च्या पुरवठ्याद्वारे वाचकसेवा केली जाते.

१६+१ असे १७ सदस्य असणाऱ्या ग्रंथालयाच्या कार्यकारी व व्यवस्थापन मंडळामध्ये १ अध्यक्ष, १ कार्यवाह, २ सहकार्यवाह, १ खजिनदार व उर्वरित सदस्यांपैकी मा. सहाय्यक ग्रंथालय संचालक, मुंबई विभाग हे एक पदसिद्ध सभासद आहेत. ग्रंथालय सकाळी तीन तास व सायंकाळी तीन तास आठवड्याचे सातही दिवस वाचकांची सेवा करते आहे.

दरवर्षी ६ मार्च रोजी संस्थेच्या वर्धापन दिन सरस्वती वंदनाने साजरा करण्यात येतो. दसऱ्यानंतर तीन दिवस शारदीय प्रबोधनमाला साजरी करण्यात येते. टिळक पुण्यतिथी, नोव्हेंबर मध्ये ग्रंथालय सप्ताह, मुंबई विद्यापीठाची बहि:शाल व्याख्यानमाला, लेखक ज्येष्ठ व्यक्ती यांच्या जयंती व पुण्यतीथी निमित्त त्यांच्या साहित्याचे दर्शन घडविणारे प्रदर्शन असे अनेक उपक्रम वाचनमंदिर भिवंडीच्या वतीने आयोजित केले जातात.

वरील उपक्रमाबरोबरच ग्रंथालय चळवळींमध्येही कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असतो. ग्रंथालय नसलेल्या गावांमध्ये ग्रंथालये चालू करणे, त्याला शासन मान्यता व शासकीय अनुदान मिळवून देणे, अनुदाना अभावी बंद पडलेली ग्रंथालये सानुदान पुन्हा सुरू करणे, असे उपक्रम ४० ठिकाणी चालू असून १८ ठिकाणी



उत्तम ग्रंथालये सुरू आहेत. या उपक्रमाद्वारे भिवंडी शहरामध्ये 'जयभारत' हे तेलगु भाषक ग्रंथालय सुरू करण्यात आले असून अनुदान मिळण्यास मदत करण्यात आली आहे. जयभारत ग्रंथालय रौप्य महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे, तर मोमीन ग्रंथालयास सुमारे ४४ वर्षे पूर्ण होत आहेत.

या ग्रंथालयाचे पूर्णवेळ ग्रंथपाल म्हणून काम करणारे श्री. गोविंद गंगाधर उपाख्य, श्री. शरद मराठे यांना

१९९६ रोजी आदर्श ग्रंथालय सेवक ग्रंथपाल पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. माजी ग्रंथालय संचालक कृ. द. पुराणिक ट्रस्ट, पुणे यांच्या तर्फे देण्यात येणारा पुरस्कार श्री. शरद मराठे यांना थोर विचारवंत पं. दाजीशास्त्री पणशीकर यांच्या हस्ते देण्यात आला.

आणि योगायोग म्हणजे काही क्षणात त्यांच्याशी गप्पा मारण्याची आनंददायी संधी मिळाली. आपल्या ग्रंथालयाची माहिती उत्साहपूर्वक देताना त्यांनी या ग्रंथालयाची अनेक वैशिष्ट्ये सांगितली. भिवंडी मध्ये एकूण कामगार वस्ती, बिगर मराठी वस्ती व मराठी वस्ती मात्र १०% असूनही हे ग्रंथालय वाटचालीत आघाडीवर आहे व त्याच्या सभासद संख्येमध्ये दरवर्षी वाढ होत आहे. बालविभाग तर अवर्जून बघण्यासारखा आहे.

दानशूर व्यक्तींकडून देणगी म्हणून आलेले जुने दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखितांचा संग्रह तर दृष्ट लागण्यासारखा आहे.

आठवड्याचे सातही दिवस सेवेत घालवणाऱ्या ग्रंथालय कर्मचाऱ्यांना शासनाच्या ग्रंथालय नियमानुसार पगार दिला जातो.

प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात या जगाच्या नियमानुसार या ग्रंथालयास अनेक अडचणीही भेडसावीत आहेत. त्यापैकी मुख्य अडचण कोणती? तर अर्थातच 'मनी मॅटर'. आपल्या मराठीत म्हणून तर म्हण पडली आहे, सगळी सोंगे आणता येतात, मात्र पैशाचं सोंग आणता येत नाही. अपुऱ्या धनाअभावी पगार अपुरे व त्याचा परिणाम म्हणजे प्रशिक्षित सेवकांचा अभाव या ग्रंथालयास पुरेपूर भेडसावत आहे.

गावाचे सांस्कृतिक वैभव असूनही स्थानिक स्वराज्य संस्थेकडून गेली अनेक वर्षे अनुदान मिळत नसल्यामुळे नव्या ग्रंथाच्या व इतर वस्तूंच्या खरेदीमध्ये मोठ्या प्रमाणात कपात करावी लागते हे सत्य शरद मराठे निदर्शनास आणून देत होते.

याहूनही मोठी भेडसावणारी समस्या म्हणजे प्रसार माध्यमे, त्यांचे अनियंत्रित अतिक्रमण यांचा वाचक वर्गावर होणारा परिणाम. ही समस्या अखिल ग्रंथालय जगताची समस्या ठरू शकते. शरद मराठे पुढे म्हणाले, यातून संस्कृती रक्षक वाचक निर्माण करणारे कार्यकर्ते आज हवे आहेत. ग्रंथालय व माहिती शास्त्रांच्या विद्यार्थ्यांना हे आव्हान व आपले कर्तृत्व सिद्ध करण्याची एक नामी संधी आहे; कारण म्हणतातच ना,

Danger never come simply, but they always bring a good opportunities with them.


हे सगळे बघत असताना पटकन मनात विचार येऊन गेला, Libraties & Laboratories are the lungs of the Social Life असे कुणीतरी म्हटले ते उगीच का? देशाचा सर्वांगीण विकास केवळ या द्वारेच होऊ शकतो. समाजाने, लोकशाही रक्षक संस्थांनी याची योग्य ती दखल वेळोवेळी घेत रहाणे, हे अत्यावश्यक आहे. समाजाचा बौद्धिक विकास करणाऱ्या या संस्थांचे रक्षण ही आवश्यक बाब आहे.

अंधार केव्हा पडला ते ध्यानातच आले नाही. परंतु या ज्ञानमंदिरातील वातावरणामुळे मनातला अंधार मात्र दूर झाला होता. मन व अंत:करण प्रसन्न होऊन प्रकाशाची आराधना करीत होते.

मंदार मकरन्द मुळ्ये
ग्रंथालय व माहितीशास्त्र
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

# बातचीत-मयूर घाटणेकर

*मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयातून शिकलेल्या मयूरचं बॅडमिंटन क्षेत्रातील नाव उल्लेखनीय आहे. त्यामुळेच त्याची ही मुलाखत घेत आहोत - संपादक*



बॅडमिंटन हा खेळ पुष्कळ जणांना पाश्चात्यांचा वाटत असेल, परंतु हा खेळ जन्माने भारतीयच आहे. या क्रीडा प्रकाराचे मूळ नाव 'पुण्याचा खेळ' असे असून सव्वाशे वर्षे उलटून देखील त्याच्या मूळ स्वरूपात फारसा फरक पडलेला नाही. पेशवाईच्या उत्तरार्धात पुण्याजवळ खडकी या लहानशा गावात इंग्रज फौजेची छावणी होती. इंग्रजी छावणीतील सैनिक १८६० च्या सुमारास हा खेळ आवडीने खेळत असत. नंतर मायदेशी परतणाऱ्या इंग्रज सैनिकांनी हा पुण्याचा खेळ इंग्लंडमध्ये नेला. पण याच खेळामुळे ठाण्यात 'मयूर घाटणेकर' सारखा हिरा निर्माण झाला. मयूरशी केलेली ही लहानशी बातचीत.

**बॅडमिंटन या खेळाचं आकर्षण कसे निर्माण झाले ?**

सुरुवातीला मी दादोजी कोंडदेव स्टेडियमवर क्रिकेट खेळायचो. परंतु माझे बाबा बॅडमिंटन खेळत असल्यामुळे व १९८८ साली ठाणे महानगरपालिकेतर्फे 'सय्यद मोदी बॅडमिंटन प्रशिक्षण योजना' राबवण्यात आल्यामुळे मी बॅडमिंटन या खेळाकडे आकर्षित झालो.

**त्याच्यासाठी कोणते व कसे प्रशिक्षण घेतले ?**

मी १२ वर्षांचा असताना दादोजी कोंडदेव स्टेडियममध्ये बॅडमिंटनचं प्रशिक्षण श्री. अनंत भागवत व श्री. श्रीकांत भागवत सरांकडून घेण्यास सुरुवात केली. नंतर गेली दहा वर्षे मी श्री. श्रीकांत वाड यांच्याकडून प्रशिक्षण घेत आहे. भारत सरकारतर्फे वाड सरांची नियुक्ती बॅडमिंटनच्या प्रशिक्षकांसाठी मलेशियामध्ये आयोजित केलेल्या प्रशिक्षण शिबिरासाठी झाली होती. त्यामुळे वाड सरांकडून मला आधुनिक प्रशिक्षण मिळते आहे. बॅडमिंटसाठी मी रोज जवळपास चार तास वेळ देतो.

**या खेळात तू बरेचसं यश संपादन केले आहेस, या संदर्भात तुझ्या करिअरमधले महत्त्वाचे टप्पे कोणते ?**

१९९६ साली राष्ट्रीय पातळीवर खेळल्या गेलेल्या एकेरी बॅडमिंटन स्पर्धेत मी तिसरा आलो, तो क्षण माझ्या जीवनातील सर्वात आनंददायी क्षण होता. खऱ्या अर्थाने माझ्या करिअरला इथूनच सुरुवात झाली. मी आणखी उज्ज्वल कामगिरी करू शकतो, या जाणिवेने मला नवी ध्येये मिळाली. एकूणच हा माझ्या करिअरमधला महत्त्वाचा टप्पा होता. तसेच त्यानंतर मिश्र दुहेरीमध्ये मिळालेलं अजिंक्यपद व गेल्याच वर्षी राज्यस्तरीय बॅडमिंटन सामन्यात जिंकलेलं अजिंक्यपद हे माझ्या करिअरमधील महत्त्वाचे टप्पे होते.

**या खेळात आणखीन कोणते यश मिळवावे असे तुझे ध्येय आहे ?**

जगात भारताचं नाव उज्ज्वल करून दाखवावं हे माझं स्वप्न आहे आणि त्यासाठीच बॅडमिंटनमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे नेतृत्व करावे अशी माझी

इच्छा आहे. तसेच राष्ट्रीय पातळीवर दुहेरीमध्ये अजिंक्यपद मिळवण्यासाठी सध्या मी प्रयत्न करत आहे.

**खेळाडू म्हणून आपल्या महाविद्यालयाकडून तुला मिळालेले सहकार्य कसे होते ?**

महाविद्यालयांकडून मला अत्यंत मोलाचे सहकार्य मिळाले. कधी कधी स्पर्धा आणि परीक्षा यांच्या तारखा एकत्र यांच्या त्यावेळी आपले प्राचार्य श्री. गोखले सर यांच्याकडून खूप मदत मिळाली व मला माझ्या खेळाकडे पूर्णत: लक्ष देण्यास वाव मिळाला. तसेच स्पर्धेच्यावेळी मला महाविद्यालयीन उपस्थितीच्या बाबतीत सवलती देऊन व नेहमी माझ्या मागे पहाडासारखं उभं राहून मला सरांनी जे सहकार्य दिलं त्याचं ऋण फेडणं कदापि अशक्य आहे. खेळासाठी प्रोत्साहन देणारं, खेळाडूंसाठी सवलती पुरवणारं 'ठाणे महाविद्यालय' हे एकमेव महाविद्यालय होय.

**बॅडमिंटनमधला तुझा आदर्श कोणता ?**

सध्या आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचं नेतृत्व करत असलेला तसेच नॅशनल चॅम्पियन व २००० साली इंग्लंडमध्ये खेळल्या गेलेल्या ऑल इंग्लड चॅम्पियनशीपचा विजेता 'गोपीचंद' हा माझा आदर्श आहे.

**अलिकडे काही व्यावसायिक कंपन्या खेळाडूंना त्यांच्या खेळासाठी स्पॉनसर करतात. त्याप्रमाणे तुला कोणत्या कंपनीने स्पॉनसर केले आहे का?**

गेली पाच वर्षे सिंगापूरची अॅशवे कंपनी मला स्पॉनसर करते आहे. या कंपनीतर्फे मला खेळाचे साहित्य, टी शर्ट, बूट इत्यादी वस्तू मिळतात.

**तू कोणत्या कंपनीत नोकरी करतोस?**

१९ व्या वर्षी मी खेळाडू या कोट्यातून वेस्टर्न रेल्वेमध्ये कामाला लागलो. त्यामुळे वेस्टर्न रेल्वेतर्फे खेळाडू म्हणून बॅडमिंटन सामन्यात मी उतरतो. नोकरी करत असतानाच मी ठाणे महाविद्यालयातून वाणिज्य शाखेतून पदवी मिळवली.

**तू तुझ्या यशाचं श्रेय कोणाला देतोस?**

माझ्या यशाचं श्रेय हे मी माझ्या आई-वडिलांना देतो. त्यांनी कधीच मला खेळामुळे अभ्यास अडतोय असं म्हटलं नाही. उलट त्यानी मला खेळासाठी, माझ्या प्रत्येक स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिलं. त्यांच्यामुळेच आज इथवर पोहोचलो. तसेच माझ्या यशात माझ्या महाविद्यालयाचा व माझे प्रशिक्षक श्री. श्रीकांत वाड यांचा देखील सिंहाचा वाटा आहे.

तुझी वाटचाल अशीच यशाकडे होत जावो व भारतासाठी तू आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक किताब पटकवावे यासाठी आमच्या 'दिशा' परिवाराकडून तुला शुभेच्छा!

**गीतेश गजानन शिंदे**
टेंभी नाका, ठाणे (प.)

# दिशा
# नियमित वाचा

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# श्रीमद्भगवतगीता - अध्याय ९ वा ।। राजविद्याराजगुह्ययोगः ।।

*गीतेच्या आठव्या अध्यायावरील लेखांनंतर राजविद्याराजगुह्ययोग या नवव्या अध्यायावर सौ. भिडे यांनी पाठविलेला लेख देत आहोत. या महिन्यात १९ डिसेंबर रोजी गीता जयंती आहे. त्यामुळे माननीय श्री. मठ यांचाही लेख अंकात समाविष्ट करीत आहोत. - संपादक*

महाभारताच्या मध्यावर गीता व गीतेच्या मध्यावर ९ वा अध्याय, भगवंताच्या कृपेने आपण गीतेच्या मध्यावर आलो आहोत. अर्धी प्रदक्षिणा झाली आहे ती पूर्णत्वास भगवंत नेतीलच.

ज्ञानदेव म्हणतात हा अध्याय अनेक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. 'आता अठरा पर्वो भारती। ते लाभे कृष्णार्जुन बाचाकी । आणि जो अभिप्राबो सातेशतीं । तो एकलाचि नवमीं ॥ अ - १०.३१ महाभारताच्या अठरा पर्वात जो अभिप्राय आहे तो कृष्णार्जुनाच्या संवादात सापडतो आणि गीतेच्या सातशे श्लोकात जो अभिप्राय आहे तो ९ व्या अध्यायात आढळतो, असा ९ वा तर अध्याय शब्दांच्या पलिकडला आहे. ९ व्या भगवंताचे बोलणे कसे झाले तर ९ व्या अध्यायासारखेच ! अतुलनीय हा अध्याय अनन्वय अलंकाराचे उदाहरण आहे.

हा अध्याय गीतेच्या पूर्वखंडातील शेवटचा अध्याय. तो भक्तीरस प्रधान आहे, हे ज्ञान प्रत्येकाच्या हृदयात असतेच पण गुरुमुखातून ऐकल्यावर त्याचा अनुभव येतो. ज्ञानदेव ज्ञानेश्वरीत त्यासाठी दृष्टांतावर दृष्टांत देत जातात. जसे गोचिड ही गाईच्या आचळातील दूध न पिता गाईचे अशुद्ध रक्त पित राहते. तिला माहिती नसते की त्वचेचा एका पदरापलिकडे गोड दूध आहे. तसे लोक जवळचे सुख सोडून विषय सुखाच्या मागे लागतात. हे करणे म्हणजे मृगजळ पाहून तोंडातला अमृताचा चुळा थुंकण्यासारखे आहे. तलावात कमळे असतात पण बेडूक त्यातला मधु न चाखता चिखलातच स्वर्गसुख मानतो. दुरून फुलपाखरे, भुंगे येऊन मध लुटून नेतात. म्हणजे जवळ, सहज, सुलभ असले तरी सर्वांना ते रुचेलच असे नाही. तत्व चिंतनावर श्रद्धा नसलेले आचरणार नाहीत, ते संसार चक्रात अडकतात.

विनोबाजी आणखी या अध्यायाचे श्रेष्ठत्व सांगतात, ते म्हणजे प्रत्यक्ष समाधीच्या वेळी ज्ञानदेवांच्या तोंडी हाच अध्याय होता.

सातव्यात - 'ज्ञानविज्ञान योग' सांगितला आठव्यात 'अक्षरब्रह्म योग' (अध्याय ८ वा मला आठवा) ९ व्यात 'राजविद्याराजगुह्ययोग' सांगितला. (माझे सतत नाम घे हरिमुखे म्हणा हरि मुखे म्हणा) म्हणजे सात, आठ, नऊचा विषय सलगच आहे. या ९ व्या अध्यायात राजविद्या ज्ञानविज्ञानासह प्रकट केली आहे. विनोबाजी म्हणतात, मी उपदेश म्हणून कैद्यांना गीता सांगितली नाही, तर त्यामुळे हरिनाम संकीर्तन होईल म्हणून सांगितली.

मृत्यूसमयी माझे स्मरण कर म्हणजे मला प्राप्त होशील असे भगवंत सांगतात. परंतु केवळ मरणाची घडी साधता येणे शक्य नाही. त्यासाठी सर्व जीवनच हरिमय व्हायला हवे. तू माझे सदासर्वदा स्मरण ठेव. मला मन-बुद्धी-अहंकार अर्पण कर म्हणजे परमपुरुष अनन्य भक्तीने प्राप्त होईल. भगवंताला वाटले की त्यासाठी भक्तीचे शुद्ध स्वरुप समजावून द्यायलाच हवे म्हणून भगवंताने आपणहून या अध्यायाला सुरुवात केली. 'अर्जुना तू माझा निर्दोष दृष्टीचा भक्त आहेस म्हणून मी तुला अत्यंत गूढ रहस्य ज्ञान विज्ञानासह उलगडून सांगतो. त्यामुळे कोणत्याही पापाचा स्पर्श तुला होणार नाही. ही सर्वश्रेष्ठ विद्या व गूढतम रहस्य आहेच शिवाय ते अत्यंत पवित्र, उत्तम, प्रत्यक्ष अनुभवास

येणारे, धर्मास अनुसरून असलेले व आचरण्यास अतिशय सोपे असे सार्वकालिक व अविनाशी असे तत्व आहे. भगवंत तिला प्रत्यक्षावगम म्हणतात.

ज्ञान व विज्ञान यातील फरक प्रथम समजावून घेऊन मग पुढे जाऊ. ज्ञान म्हणजे शास्त्रीय सत्य प्रतिपादक विधान उदा. पृथ्वी गोल आहे. विज्ञान म्हणजे त्या शास्त्राचा जीवनातील उपयोग सांगणारे विवेचन. उदा. पृथ्वी गोल आहे ती स्वत: भोवती फिरते म्हणून दिवस व रात्र होतात. तसेच ज्ञान म्हणजे आत्मज्ञान व विज्ञान म्हणजे विश्वज्ञान हे लक्षात ठेवा.

राजविद्या - सर्व विद्यात श्रेष्ठ विद्या. राजगुह्य - गुह्यांचा राजा असे श्रेष्ठ ज्ञान, अत्यंत गूढ रहस्य. जीवनाची सांगड परमार्थाशी कशी घालायची हे गीता शिकवते, असे गीता रहस्यात लो. टिळकांनी म्हटले आहे.



संत तुलसीदास म्हणत मेल्यावर स्वर्ग मिळेल की नरक कोणी पाहिलय, पण जे जीवन जगायचे ते रामाचे गुलाम होऊन राहण्यात मला आनंद आहे. परमपूज्य गोंदवलेकर महाराज पण रामनामाचाच मंत्र जपायला सांगतात. याची देही याची डोळा अनुभवास येणारे फळ, जीवंतपणी अनुभवास येणाऱ्या गोष्टी या अध्यायात सांगितल्या आहेत. गूळ खाताना गोडी प्रत्यक्ष अनुभवास येते तसे रामनामाची गोडी कशी अनुभवावी ते या अध्यायात सांगितलेय. मर्त्य लोकांच्या जीवनातील गोडी प्रत्यक्ष अनुभवास आणून देणारी राजविद्या या अध्यायात सांगितली आहे. ती राजविद्या गूढ आहे, पण भगवंतानी ती सर्वास सुलभ, सोपी व उघडी करून ठेवली आहे.

'वेद' हे पहिले प्राचीन लिखाण. या वेदांचे 'गीता' सार आहे. या वेदात यज्ञयाग, क्रिया, तपश्चर्या, नाना साधना सांगितल्या आहेत. शिवाय त्याचा सर्वांना अधिकारही नाही. त्या इतक्या क्लिष्ट की सर्व सामान्यांना तर समजणार पण नाहीत. म्हणून संतानी वेदाचे सार सर्वांना सांगितले ते म्हणजे हरिनाम. वेदांच्या कडीकुलुपात अडकलेला 'मोक्ष' भगवंतानी स्त्रिया, वैश्य, शूद्र, मुले, अपंग आडाणी, दीन-दुबळे, रोगी राव रंक सर्वांसाठी राजमार्गावर आणून ठेवला. मोक्षाची साधी सोपी युक्ती सांगितली. ज्याचे जे साधे रोजचे जीवन, जे स्वधर्मकर्म, सेवाकर्म ते यज्ञमय करावे. दुसरे यज्ञयाग हवेत कशाला ! ते यज्ञमय कसे करावेत तेच भगवंत येथे सांगत आहेत. 'रोप वे'ने उंच डोंगरावर जातांना आपण इतक्या उंच जात आहोत हे समजतही नाही. हळूहळू आपणाला उंचावर नेले जाते ही त्या तंत्रज्ञानाची किमया. तसेच मनुष्य रोजचे कर्म करीत जेथे उभा आहे तेथे त्या साध्या कर्मानेही 'परमात्मा (मोक्ष)' गाठता येऊ शकेल, असा हा राजमार्ग आहे. त्यासाठी एवढेच करायचे की जे काही खाशील-पिशील-झोपशील-उठशील ते सर्व काही भगवंताला अर्पण करायचे. हे या नवव्यात सांगितले आहे. मोक्षावर फक्त मानवाचाच हक्क नाही तर सर्व प्राणी, पशु, पक्षी सर्वांचा

अधिकार आहे. कृष्णाच्या गाई, रथाचे घोडे हेही कृष्णमय होऊन जात.

देव कुठे लपलेला आहे ? घळीत, नदीत, स्वर्गात, खाणीत असा का लपलेला आहे ? सोनं-चांदी पृथ्वीच्या पोटात दडलेले असते तसा देव थोडीच खणून काढायचा आहे ? तो तर चराचरात सर्वत्र भरलेला आहे. 'मी सर्व प्राणिमात्रात आहे' हे भगवंत पुन्हा पुन्हा सांगतोय. म्हणूनच जनता जनार्दनाची पूजा करा. उपमर्द करू नका. कोणाला दुखवू नका. सर्वांशी गोड बोला.

'मोक्ष' विद्वत्तेवर, जातीधर्मावर अवलंबून नाही तर तो स्वधर्म कर्मावर अवलंबून आहे. त्यासाठी साधी भोळी भक्ती पुरे. सर्व कृत्यांचा संबंध परमेश्वराशी जोडावा. कर्म शुद्ध भावनेने आणि सेवेसाठी केलेले असावे. म्हणजे ते यज्ञरुप होते. यासाठी व्यासांनी महाभारतात सम्राट जनकाला सामान्य 'स्त्री'कडे विद्या जाणण्यासाठी पाठवले. तुलाधार वैश्य तराजूची दांडी सरळ राखण्यात माझे सारे ज्ञान आहे हे जाबाळी ब्राह्मणाला सांगतो. तसेच व्याध-कसाई एका अहंकारी ब्राह्मणाला गुरूने यत्किंचित कसायाकडे जायला लावले. तो ब्राह्मणाला म्हणतो कसायाचे कर्म (मास कापण्याचे) मी लोकांची सेवा म्हणून मनापासून करतो.

या गोष्टींनी स्त्रिया, वैश्य, शूद्र या सर्वांना मोक्ष कसा मोकळा आहे, हेच उघड केले आहे. इथे एक प्रश्न मनात येतो की परमात्म तत्वाला विश्वयोनी जगदंबा म्हटले आहे. शिव +शक्तीचे अद्वैत दाखवले आहे. मग पुरुष-स्त्री बरोबरचेच, समान. दोघांनाही सारखाच अधिकार वगैरे वर्णन केल्यानंतर पुन्हा स्त्रियांना वैश्य, शूद्र यांच्या पंक्तीत आणून, बसून त्यांनाही मोक्ष मोकळा आहे हे वेगळे सांगण्याचे - भगवंताचे प्रयोजन काय ? असो, हेच तत्व, कर्मयोग व भक्तीयोग यांची सांगड या अध्यायात घातली आहे.

कर्म योग - कर्म करायचे व फळाचा त्याग करायचा. झाड लावायचे ते फळ चाखायची अपेक्षा ठेवून नाही.

*भक्ती योग - भावपूर्वक ईश्वराशी जोडले जाणे*

*राजयोग - कर्मयोग + भक्तीयोग*

कर्मयोग व भक्तीयोग यांची सांगड घातली ती कशी ? तर कर्म करायचे परंतु फळ टाकायचे नाही, ते देवाला अर्पण करायचे. किंबहुना मनातले काम-क्रोधादी विकार व वासनाही देवाला द्यायच्या व मोकळे व्हायचे. प्रत्येक इंद्रिय ईश्वरापर्यण बुद्धीने वापरणे हा राजमार्ग व हाच राजयोग म्हणजे कानाने कीर्तन ऐक डोळ्याने रुप पहा व मुखाने नाम घे. अमुकच देवाला अर्पण करायचे असे नाही तर सारे काही म्हणजे जे काही करता ते सर्व कर्म भगवंताला अर्पण करायचे. कोणतेही कर्म हे भगवंताचे आहे, त्याच्यासाठी करतोय या भावनेने केले तर ते साधेच कर्म पवित्र होते, यज्ञरुप होते. जेवायला बसतांना आपण

'वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरिचे ।<br>
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ॥<br>
जीवन करि जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म ।<br>
उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ॥' असे म्हणतो.

म्हणजे रोजची, जेवणाची क्रिया ही सुद्धा श्रीहरिचे नाम घेतल्यावर यज्ञकर्म होऊन जाते. अंधारात वीज आली की सारे एकदम प्रकाशमय होते. तसेच प्रत्येक क्रिया ईश्वराशी जोडल्या की जीवनात अद्भुत शक्ती येते. मग सारे जीवन रमणीय व नमनीय होते.

रामदास स्वामी म्हणतात, 'सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जे करील त्याचे । परंतु तेथे भगवंताचे । अधिष्ठान पाहिजे ॥ कुठल्याही शुभकार्याच्या प्रारंभी आपण देवाला आवाहन व नमन करतो ना ! तसेच प्रत्येक क्रियेलाच कार्य समजून भगवंताचे स्मरण केले पाहिजे. सर्व कर्मांचा नैवेद्य-प्रभुला अर्पण करायचा आहे ही भावना जसजशी उत्कट होईल तसतसे क्षुद्र जीवन दिव्य होईल. ईश्वराला जे अर्पण केले ते पेरले गेले. थोडे पेरले तरी अनंतपटीने

भरभरून मिळेल. 'देणाऱ्याचे हात हजारो दुबळी माझी झोळी' अशी स्थिती होईल. 'देता किती घेशी दो कराने' अशी अवस्था येईल. त्यामुळे जीवनात अपार आनंद, परम पवित्रता, मंगल मांगल्य येईल.

कर्मयोगात तोडलेले फळ राजयोगात जोडले जाते. कर्म करायचे आणि त्याचे फळ न टाकता ईश्वराला ते अर्पण करायचे. असा हा राजयोग कर्मयोगाच्याही पुढे पाऊल टाकतो. कर्मयोग म्हणतो - कर्म करा व फळ टाका. फळाची अपेक्षा धरू नका. इथे कर्मयोग संपला. राजयोग म्हणतो - 'कर्माची फळे टाकू नका ती देवाला वहा. ती फुले, कर्म फुले त्या मूर्तीवर वहा. एकीकडून कर्म व दुसरीकडून भक्ती. असा प्रपंच व परमार्थाचा मेळ घालून जीवन सुंदर बनवा.'

फळ त्याग करू नकोस, फळ फेकू नकोस ते देवाला दे. त्याला अर्पण कर. भगवंतासमोर किती राशी ओतल्या याला महत्त्व नाही. महत्त्व किती अर्पण केले याला नाही. कसे अर्पण केले याला आहे. 'पत्रं, पुष्पम, फळम्, तोयम्, यो मे भक्त्या प्रयच्छति' भक्तीभावनेने अर्पिलेल्या तुलसी पत्राला सुद्धा ब्रह्मांडाचे वजन प्राप्त होते. विदुराच्या कण्या, सुदाम्याचे पोहे, द्रौपदीच्या थाळीचे पान त्या मागच्या भक्तीभावनेमुळे भगवंताला गोड लागले.

मनाचा व देहाचा संबंध जसा आहे तसाच ईश व जगतांचा. ईश हे स्थूळ जगताचे सूक्ष्म कारण. भगवंत म्हणतात मी आपल्या अव्यक्त मूर्तीने सारे जगत व्यापले आहे. जगत ही 'अव्यक्ताची मूर्ती' आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात 'माझा विस्तार म्हणजेच हे जग नव्हे का ! दूध मुरले की तेच दही होते (घन), बीजाचा विस्तार वृक्ष, सोन्याचा विस्तार अलंकार तसेच माझे अव्यक्तपण घनीभूत झाले मग तेच विश्वाकाराने विस्तारले सारी भूते जलावर फेस दिसावा त्याप्रमाणे माझ्या ठिकाणी दिसतात. पण त्या फेसात पाणी नसते. स्वप्नात ज्या गोष्टी दिसतात त्या जागेपणी थोडीच असतात ! तसेच सारी भूते माझ्यात दिसतात पण मी त्यांच्यामध्ये नाही. मागे हा विषय मी सातत्याने सांगितला आहेच.

या सर्व भूतावरून (विश्वारून) माझी कल्पना येणार नाही. एखादा कलावंत आपली कलाकृती बनवतो त्यावेळी त्याच्या मनात प्रथम अव्यक्त कल्पनाचित्र असते ते तो कागदावर साकार करतो. तरी म्हणतो माझ्या कल्पनेतलं चित्र मी पूर्णपणे साकार करू शकलो नाही. तसा परमात्मा भूतात पूर्ण साकार होत नाही, तो या विश्वाच्या दशांगुळे वरच उरलेला असतो.

भगवंत म्हणतात, मी प्रत्येक भूतांत आहे. कारण विश्वातील प्रत्येक वस्तू माझ्या ज्ञानसंकल्पनेस आलेला आकार आहे. परंतु भूते माझ्यात नाहीत (म्हणजे त्या आकारावरून माझे पूर्णस्वरुप ध्यानी येणार नाही. उदा. टेबल, खुर्ची लाकडाचे आहे असे म्हणता येते. पण तरीही लाकूड म्हणजे टेबल-खुर्ची म्हणता येणार नाही.) ज्ञानेश्वर महाराज सांगतात, 'फेस पाण्याचाच असला तरी फेसात पाणी नसते. म्हणजे हे स्थूल विश्व चैतन्यापासून झाले असले तरी त्या स्थूलात चैतन्याचा लोप झाला आहे. माझ्या ठिकाणी भूते आहेत. या दृष्टीने विश्वाकडे पाहू नकोस तर भूते म्हणजे माझे 'योगेश्वर्य' या दृष्टीने विश्वाकडे पहा.

माझ्या ठिकाणी भूते आहेत मी भूतांचे ठिकाणी आहे. (भूतांना उत्पन्न करणारा आहे.) यापैकी काहीही खरे नाही. (५) ही फारच परस्पर विरोधी विधाने आहेत. ती थोडी लक्षपूर्वक समजवून घेऊया -

विश्व हे परमात्म्याचेच रुप (प्रकाश) मी भूतात आहे. भूते माझ्यात आहेत येथे संबंध दाखवला जातोय. पण संबंध नेहमी दोन वेगवेगळ्या वस्तूत असतो. व्यक्तीत असतो. तसे येथे नाही. मीच सारे काही असल्याने माझ्यात भूते आहोत म्हणणे बरोबर होणार नाही. कारण असे म्हणण म्हणजे माझ्यात मी आहे. म्हणण्यासारखेच होईल ! ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'मी सर्व भूतांसी अभिन्नु । जैसी प्रभा आणि भानू । एकचि तो ॥ ज्ञा. ६

शंकराचार्यांचा 'मायावाद' सांगतो (ब्रह्म सत्य जगत् मिथ्या) म्हणतात पण विश्व हे आभासात्मक वा मिथ्या नाही. विश्व हे परमात्म्याचा अंश आहे. विश्व दिसतं ते अज्ञानातून. वास्तविक जड जगत चैतन्यच आहे. मायावादाच्या चिंतनाने स्थूलाचा निरास केला तर जगत कसे दिसेल ? तर तो चिद्‌विलास दिसेल चैतन्यच दिसेल. जसे पितळेतून हिणकस (मळ) काढून घेतला तर ते सोनेच होईल. विश्व हे भगवंताचे ऐश्वर्य आहे. ईश व जगत यांचे नाते सूर्य व त्याची प्रभा याप्रमाणे आहे. भगवंत स्वत: आपले हे नाते सविस्तर समजावून सांगतात. 'आकाशापासून उत्पन्न झालेला सर्वत्र संचार करणारा वायू नेहमी आकाशातच स्थित असतो. तशीच सर्व भूते माझ्यात स्थित असतात. भूते म्हणजे वायू व आकाश म्हणजे परमात्मा. वायू सर्वत्र संचार करतो तरी तो आकाशातच असतो तद्वत ही भूते माझ्यात.

वायू म्हणजे वारा नव्हे हे लक्षात घ्या. हवा (वारा) सतत गतिमान नसते. (हवेतील घटक ऑक्सिजन नैट्रोजन हे विशिष्ट तपमानात थंड केले तर रंगरुप धारण करतात.) वायू हे तत्व कोणत्याही - परिस्थितीत रुपहीन तसेच सतत गतिमान. आपल्या गतीने विश्वात घडामोडी घडवून आणणारे शक्तिमान तत्व आहे. हे वायुतत्व म्हणजे विद्युत स्पंदने. ही स्पंदने वायु लहरीप्रमाणे वाटतात. भगवंत म्हणतात, ही सारी भूते वायू प्रमाणे आहेत याचा अर्थ वायू लहरीप्रमाणे आहेत. याचा अर्थ त्या लहरी आहेत. या लहरी विद्युत कणांच्या असतात हे तर आधुनिक विज्ञानही मानते. सारे विश्व विद्युत कणांचेच आहे. म्हणजेच वायुप्रमाणे स्पंदनरुप किंवा लहरीरुप.

वायू गतिमान आहे सर्वगामी आहे परंतु त्याची खरी गती आकाशातच सामावलेली आहे. आकाशाची शांती व वायूची गती एकत्रच आहेत. वायू त्याच्या गतिमानतेनेच भासमान होतो. 'हालविल्या वेगळा दिसे एरव्ही गगन तो तोचि.' (ज्ञानेश्वरी) परमात्म तत्व हे आकाशवत आहे असे प्राचीन शास्त्र सांगते. आकाशात वायू त्याचप्रमाणे विश्व हे परमात्मतत्वाचे स्पंद-रुप व निस्पंद-रुप म्हणजे हे परमात्म तत्व ! आकाशापासून वायू उत्पन्न होतो. आकाश हे परमात्म्याचे प्रतीक मानले जाते - उपनिषदाने म्हटले आहेच.

परब्रह्म-चित्‌सूर्य असे ज्ञानेश्वर म्हणतात. परब्रह्माची स्वसंवेद्य-प्रकाशावस्था याच अवस्थेला परमात्मा किंवा पुरुषोत्तम म्हणतात. परब्रह्माच्या ठिकाणी 'एकोहं बहुस्याम्' हे स्फुरण झाले हेच ईश्वराचे स्वरूप हाच 'अक्षर' पुरुष ! ईश्वर ज्ञानशक्तियुक्तच असतो. अहमचे स्फुरण हीच ज्ञानशक्ती. ती त्याच्याहून वेगळी नाही. ही 'ज्ञानशक्ती व ईश्वर' अर्धनारी नटेश्वर असतात. दोघे मिळून एक. दोघे असले तरी अद्वैतच. पुरुष प्रकृती ही दोन तत्वे असली तरी ती द्वैत नाहीत. शिव-शक्ती ही जगाची जनके होत असे अमृतानुभावात ज्ञानदेव म्हणतात. - सूर्य - प्रभा, रत्न-कांती, मोती-पाणी हे एकरूपच आहेत.

ज्ञानशक्ती - ज्ञान - बल (सामर्थ्य) - क्रिया (कर्म) या ज्ञान शक्तीलाच, भगवद्‌गीतेत 'पराप्रकृती', 'अक्षरतत्व', 'परमपुरुष', 'परमगती', 'परमधाम', 'विश्वयोनी जगदंबा' म्हटले आहे. प्रकृती व माया याचा वेगळेपणा समजून घेऊया.

प्रकृती - प्रत्यक्ष विश्वरुपात व्यक्त झालेली परमात्म्याची ज्ञानशक्ती.

माया - परमात्म्याची सुप्त, अनंत ज्ञानशक्ती !

(Dynamic Energy and Potential Energy )

विश्वाच्या प्रभव प्रलयाचे (उत्पत्ती व विनाशाचे) नाट्य अनादी काळापासून चालूच आहे.

विश्वनिर्मिती कशी होते व लय कसा होतो हे भगवंत समजावून सांगतात. १) परमात्मा प्रकृतीचा अंगीकार करतो. २) तिच्या आधीन होतो मग हा भूत समुदाय वारंवार निर्माण करतो. कल्पाच्या अंती सर्व भूते माझ्या प्रकृतीत लय पावतात व कल्पारंभी मी त्यांना पुन: उत्पन्न करतो. ३) परमात्मा अध्यक्ष असतो तो उदासीन,

अलिप्त असतो. त्याच्या अध्यक्षत्वाखाली (अस्तित्वामुळे) माझी प्रकृतीच चराचर सृष्टी निर्माण करते. ४) ही कर्मे परमात्म्यास बंधनकारक होत नाहीत. ५) हे विश्वाच्या विभव-प्रलयाचे चक्र अनादी अनंतकाळ सुरू असते. मी माझ्या प्रकृतीला वश करून ही सृष्टी निर्माण करतो. ही प्रकृतीच भूतांची जननी आहे. 'महत ब्रह्म' हिच्या ठिकाणी मी पिता गर्भ स्थापन करतो. सात्त्विक, राजस, तामस भाव माझ्यापासूनच निर्माण होतात. ते माझ्यात आहेत पण मी त्यांच्यात नाही. सत्व, रज, तम ही त्रिगुणात्मक सृष्टी माझ्यापासून झाली या त्रिगुणांचीच अष्टधा प्रकृती (अपरा प्रकृती) असते. त्यात पंचमहाभूते + मन + बुद्धी अहंकार येतात. भूतमात्रांना उत्पन्न करणारा व त्यांची वृद्धी करणारा जो सृष्टी व्यापार त्याला 'कर्म' म्हणतात.

सप्तऋषी आणि चौदा मनु (प्रमुख चार) हे माझे मानस. त्यांची ही प्रजा. 'सप्तर्षी' - प्राणतत्व. हा प्राणरुप ऋषी सृष्टीसाठी सप्तर्षि बनतो. ही सप्तक संज्ञा विश्वरचनेचे मूळ आहे. मन + प्राण + पंचमहाभूते या सप्तकाच्या विकासातूनच सृष्टी निर्माण होते. ज्ञानशक्तीमय जे तत्व त्यास मन म्हणतात. पराप्रकृतीत परमात्म्याचे मानसभाव निर्माण होतात व तेथून पुढील सृजन सुरू होते. अक्षरातून ब्रह्म (विश्वात्मक मन), ब्रह्मातून कर्म, कर्मातून यज्ञ, यज्ञातून जल, जलातून जडतत्व उदयास येते. बुद्धी, ज्ञान, जागृती, दया-क्षमा-शांती, सत्य, इंद्रिय-निग्रह, सुख-दुःख, उत्पत्ती-लय, भय-अभय, समता-संतोष, समाधान, दानधर्म,यश-अपयश इ. प्राणीमात्रांचे प्रकृतिधर्म माझ्यामुळेच (ब्रह्म तत्वातून) निर्माण होतात. ज्ञानदेव म्हणतात, पाण्यात शेवाळं निर्माण होतं नि ते पाण्यालाच झाकतं, दृष्टीवर पडदा येतो तद्वत स्थूलसृष्टी निर्माण झाली की तिच्यामुळे परतत्व दिसेनासे होते. या सृष्टीकडे माझे योगैश्वर्य म्हणून पहा. जेव्हा सृष्ट पदार्थातील अनेकत्व एकाच मूलतत्वाचे विकसन आहे व ते एकाच अधिष्ठानावर आहे हे कळते तेव्हाच ब्रह्मज्ञान होते.

भगवंताने माया निर्माण केली नाही. त्याच्या ठिकाणी जो 'ज्ञानशक्तीचा' उदय (अहं स्फुरण) हेच तिचे स्वरुप. माया म्हणजे त्रिगुणात्मक सृष्टि, अष्टधाप्रकृती, 'एकोऽहं बहुस्याम' मी एकटाच अनेक रुपाने नटतो. (अनेक रुपे अनेक वेषे पाहिला म्या त्यासी-ज्ञानदेव म्हणतात.) कारण मला एकट्याला करमत नाही. असे मायेचा हेतू स्पष्ट करतांना वेदांनी सांगितले. ज्ञानदेवानी सहाव्या अध्यायत म्हटलय की भगवंताला वाटते जर अर्जुनाचा अहंभाव गेला नि तो मद्रूप झाला तर मी पुन्हा एकटाच. मग मी कोणाशी बोलू ? प्रेमाने आलिंगू ? याचाच अर्थ त्याला एकटे राहणे आवडत नव्हते. 'अमृतानुभवात' मात्र विश्व उत्पत्तीचा हेतु वेगळा मांडलाआहे. द्वैतातून 'शिव+शक्ती'ला अद्वैताचा आनंद (एकात्मतेचा, ऐक्याचा) भोगायचा असतो. (पती-पत्नीच्या एकात्मतेतूनच नवीन जीवाचा जन्म होत असतो. ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलला अद्वयानंद आपण सर्वच अनुभवीत असतो नाही का?) मायेमुळे आत्मा सगुण साकार होतो तर परमात्म्यामुळे प्रकृतीचा विकास होतो. स्वरुपानंद भोगण्यासाठी 'शिवशक्ती' एकमेकांचे आरसे होतात. आत्मा इंद्रियाद्वारे उपभोग घेतो. असे गीता म्हणते. त्यामुळे विश्वातील प्रत्येक वस्तू ही शिवशक्तीच्या प्रीतीचे प्रत्यक्षरुपच (अपत्य) आहे. प्रकृती-पुरुष हे वास्तविक द्वंद्व परंतु ते शिवशक्तीरुप असल्याने 'अद्वैत'च असते. अद्वैताचा तो विविध रुपाने साक्षात्कारच होत असतो. अद्वैत ज्ञानदेवांनी मानलेलं नाही. शिवशक्ती रुप दंपती 'अ-द्वय' आहे (दोन मिळून एकच) अद्वैतात दोन्ही वस्तू सत्य हव्यात. पुरुष सत्य व प्रकृती मिथ्या अस चालत नाही. म्हणून प्रकृती व पुरुष दोन्ही सत्यच. (चैतन्याचा प्रकाश) सूर्य व त्याची प्रभा जशी सत्य व एकच तसेच पुरुष प्रकृती.

'ब्रह्म सत्य जगत मिथ्या' ठरवले तर जीवनात कोणताही उत्साह वा रस वाटणार नाही, पुरुषार्थ ठरणार नाहीत, जिद्द निर्माण होणार नाही. म्हणून संबंधरहित अनेकता, द्वैत नको व विविधता शून्य एकता नको. म्हणून

ज्ञानदेवांनी व इतर संतांनी एकत्वाच्या पायावर विविधतेचा आस्वाद असा मधुर भक्तिरस अभिव्यक्त केला. शिवशक्ती तादात्म्य हेच ईश्वर रुप अक्षर रुप. या परब्रह्मात शक्तीस्फूरण झाले की त्यास ईश्वर म्हणतात. ही (स्फुरण) ज्ञानशक्तीच सर्व विश्वरचना करते. शिव-शक्ती (पार्वती), विष्णु-लक्ष्मी, कृष्ण-रुक्मिणी हे दोन मिळून एक ईश्वर.

या जगाचा पितामह मीच. माता-पिता मीच. मीच धारण पोषण करणारा. जाणण्यास योग्य असा पवित्र ओंकार तसेच ऋग्वेद, सामदेव, यजुर्वेदही मीच आहे.

परमात्मा (एकच) (शक्तीस्फुरण) पितामह (आजोबा)

पुरुष - प्रकृती

(शिव-शक्ती) दंपती ही जगताची जनके

जगत (प्रत्येक प्राणीमात्र स्पंदनरुप - माझेच रुप)

शिव-आत्मा (अदृश्य) शक्ती - देह (दृश्य)

परमात्मा - शिव+शक्ती - जगत (एकत्व भंग न पावता अनेक त्याचे विकसन)

(तद्वतच कापूस -धागा-वस्त्र) ऋषिमुनी म्हणतात की स्पंदनाचा ध्वनी 'ओंकार' आहे, म्हणून 'ओंकार' अक्षर रुप. अक्षरावाचून (स्पंदनावाचून) ज्ञान-गान वा निर्माण काहीच शक्य नाही. म्हणून ऋक-साम-यजु ही परब्रह्माचीच रुपे.

अर्जुना, तुला सांगतो यज्ञ मीच. श्राद्धात पितरांना अर्पिलेले अन्न मीच. वनस्पतिजन्य अन्न मी, मंत्र, तूप मी, होमद्रव्य मी. अग्नितील आहुती मीच. मीच जगताचा पिता, माता आधार, पितामह मीच. जे पवित्र, ज्ञेय ते मीच. पोषणकर्ता, निवारा, साक्षी, गती, सखा, उत्पत्ती-स्थिती-लय आणि अव्यय बीज मीच. मीच उष्णता देतो, पाऊस पाडतो. अमृत व मृत्यू मीच. सत् व असत् मीच. तीन वेदातील यज्ञयागादी श्रौतकर्म पाळणारे व काम्य उपभोगाच्या मागे लागलेले कर्मठ माझी यज्ञाने पूजा करून स्वर्गाची इच्छा करतात. ते इंद्राच्या पुण्य लोकास पोचून स्वर्गात देवांचे दिव्यभोग भोगून पुण्याची पुंजी संपली की परत मृत्यू लोकात जन्माला येतात. याप्रमाणे ते स्वर्ग, मृत्यू लोकाच्या येरझारा करतात. पण अर्जुना जे अनन्य भावाने मला भजतात व माझे चिंतन करतात त्या माझ्याशी एकनिष्ठ पुरुषांचा योगक्षेम मी चालवतो. उदा. तुकाराम, एकनाथ आदी सर्व संत. पण जे श्रद्धायुक्त भक्त अन्य देवतांची उपासना करतात ते देखील विधीपूर्वक नसली तरी पर्यायाने माझीच आराधना प्रार्थना करतात.

प्राणीमात्रांना प्रकृतीची मोहिनी पडते त्यात ते गुंतून जातात त्यामुळे सर्व व्यर्थ जाते. पंचमहाभुते - पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश.

पृथ्वी तत्व - सौंदर्य, देहाचं आकर्षण

आप (पाणी) - पेये (रंगीत चवदार कोल्ड्रिंक्स (शीतपेये)

वायु - (गतिमानता) नृत्य, रेस, क्रीडा

आकाश - शब्द स्वरांची मोहिनी - गाणे, वाद्ये वगैरे

पंचमहाभुते + मन + बुद्दी + अहंकार = अष्टधा प्रकृतींची मोहिनी

मन - विकार, मोह, माया. बुद्धी - मत्सर, स्पर्धा, हेवेदावे, राजकारण

अहंकार - रूपाचा, तपाचा, ज्ञानाचा, दानाचा वगैरे

ही प्रकृती मोहिनी, आपल्याला नाचवते म्हणून शिवाचा विसर पडतो. त्यामुळे 'सारे मुसळ केरात' तसे आशा, कर्म सारे व्यर्थ जाते.

कीर्तन हा नवविधा भक्तीचा एक प्रकार. कीर्तन म्हणजे नामसंकीर्तन. पण नामसंकीर्तन म्हणजे जपमाळ ओढणे नव्हे. प्रत्येक स्थूल वस्तूत परमेश्वर पाहणे. गोपींना सर्व गोष्टींत कृष्णाचे दर्शन, स्मरण व्हायचे हेच कीर्तन 'सोऽहं'चा जप श्वासावर चालणारा. माणसातल्या देवत्वाला जागं करणं, त्याला प्रेमानं साद घालणं म्हणजे कीर्तन. परमात्म तत्वाचे सतत प्रतिपादन म्हणजे कीर्तन. परमात्म तत्व म्हणजे स्थूलापलिकडील सृष्टी, विविधते

मागची कालातीतता, एकता, आनंदपूर्णता, चैतन्यममता व ज्ञानमयता 'पत्रं, पुष्पं, फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छती।' भक्तीने, मन:पूर्वक दिलेले काहीही देवाला चालते. पात्रता, अधिकाराचा प्रश्न नाही. जातीपातीचे बंधन नाही. महत्त्व नाही, महत्त्व आहे ते भक्ती भावाला. ज्ञानदेवांनी ९ व्या अध्यायात यासाठी ते इतक्या ओव्या लिहिल्या आहेत. भक्ती म्हणजे आत्म्याची परमात्म भेटीची ओढ, तळमळ, आर्तता. अहंला आकार येतो अहंकार होतो. अहंची समाप्ती तिथे भक्तीची सुरुवात. प्रत्येकाची भावना गोपीच असते. मोक्षाची ओढ साद घालते (देहाच्या पिंजऱ्यातून सुटून व्यापकात झेप.) आत्म्याला परमात्माची ओढ. तत् त्वम् असि । तत्वमसि - ते ब्रह्म तूच आहेस.

थोड्यानेही देव संतुष्ट होतो. अध्याय ३ मध्ये तुम्ही देवाला द्या तो तुम्हाला दाम दुप्पट देईल, म्हटले आहे. जीवनातील सकल कर्मे मला अर्पण कर हाच यज्ञ-हीच पूजा-हाच संन्यास. माझी भक्ती कर्मांनीच कर, कर्मफुले मला अर्पण कर. यामुळे कर्मबंधनातून सुटून मला पावशील. देह आहे तोवर कर्मत्याग असंभव. म्हणून कर्मकर्तृत्वाचा, अहंकाराचा त्याग कर. ती कर्मफळे मला अर्पण कर. 'पत्रं, पुष्पं, फलं, तोयं' म्हणून. हाच कर्मयोग, हाच संन्यास, हीच भक्ती. जो विभक्त नाही (माझ्यापासून) तो भक्त हीच भक्तीची व्याख्या.

कर्मयोग - फळाची आशा न करता कर्म करणे.

संन्यास - कर्म करून फळाचा त्याग.

भक्ती - कर्म करून फळ देवाला अर्पण करणे.

खरा मी सर्व भूतात सारखाच असतो. मला कोणी प्रिय वा अप्रिय नाही. परंतु जो प्रेमाने, भक्तीभावाने मला भजतो त्याच्यात मी असतो व तो माझ्यात, ईश्वराचे होऊन राहणे हाच मोक्ष. रामकर्ता मानणे, तोच कर्ता करविता.

विश्वाच्या विविधतेतील एकत्वाचे दर्शन हीच ज्ञानाची व विज्ञानाची पराकाष्ठा आहे. या एकत्वाचा साक्षात्कार झालेले संत महंत सांगतात की तो अनुभव अत्यंत आनंददायी आहे. हा एकत्वाचा शोध व साक्षात्कार ही ज्ञानाची परिसीमा. हा अखंड अत्यंत आनंददायी आहे. या एकत्वाचेच वैदिक नाव परब्रह्म. हे ब्रह्म अनंत, असीम प्रकाशमय, चैतन्यपूर्ण, ज्ञानमय आहे. परमात्मा म्हणजे कालातीतता, समग्रता, व्यापकता, ज्ञानमयता, अनंतता असे संत म्हणतात. याची देही याची डोळा याचा साक्षात्कार घडतो. जीवनाला ब्रह्मस्पर्श होतो. हे सारे अनुभवणारा तुका आकाशाएवढा होतो एवढेच नाही तर आकाशासारखाही होतो.

मन, बुद्धी देहाशी चिकटली की अहंकार येतो. मानवी जीवन देहाच्या मापाने नसते. ते मापायचे मनाच्या, बुद्धीच्या आत्म्याच्या विशालतेने. विशालता निराकार असते. म्हणून तुका आकाशाएवढा होतो. अहंभाव नाहीच. विश्वात्मक व्यक्तिमत्त्व.

परमात्म तत्व म्हणजे जणु एकात्म संस्थात्मक जीवन. संस्था काय किंवा राष्ट्र काय याच संकल्पनेवर उभी राहतात. एकात्म संस्थात्मक जीवन उभे करणे म्हणजे परमात्म्याचा साक्षात्कार. देहाची बॉडी लाईन व्यापक करणे ती कुटुंब, समाज, गाव, राष्ट्र, विश्व अशी विशाल व्यापक वाढवणे, 'हे विश्वचि माझे घर' ही भावना निर्माण होणे. प्राचीन काळी ऋषींना ज्ञानाने एकत्वाचा साक्षात्कार करून घेता यायचा. पण संतांनीही आपला अनुभव सांगितला की भावनेनेही साक्षात्कार होतो. एकत्वाकडे भावनेने केलेली वाटचाल म्हणजे भक्ती! ज्ञानाची वाटचाल बुद्धीने, तर भक्तीची वाटचाल भावनेने होते.

राम-श्रीकृष्ण हे अवतार, शिवाजी, लोकमान्य, विवेकानंद हे समाज पुरुषाने स्वीकारलेले - पूर्णत्वाचे आदर्श. केवळ नामसंकीर्तनाने संपूर्ण जीवन कर्मांच्या श्रवणाचे अनामिक संस्कार जागृत होऊन आनंदाच्या भाव लहरी उठू लागतात. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' असे होऊन जाते. जय जय रामकृष्ण हरी, ज्ञानोबा माऊली तुकाराम' असाही जप केला जातो. परब्रह्माचा जप

'सोऽऽहं' असा करतात. परमात्मा निराकार असला तरी तो भक्तीने साकार होतो.

लोककल्याणासाठी, लोकसंग्रहासाठी जे कर्मरत असतात ते ज्ञानदेवांसारखे योगीराज किंवा भगवान श्रीकृष्णासारखे प्रभुराज किंवा शिवप्रभु सारखे राजाधिराज तरी असतात. भगवंत म्हणतात, 'पापी, दुराचारी ही जर अनन्य भावाने मला भजेल तर तो संतच समजला पाहिजे. कारण जो यथार्थ निश्चयी आहे तो लवकरच धर्मात्मा होतो. त्यास शाश्वत शांती मिळते. अर्जुना तू हे लक्षात ठेव की माझा भक्त कधीही नाश पावत नाही.

विश्व 'अनित्यं असुखं' आहे पण या विश्वातच नित्य सुसुखं' परतत्वही आहे. त्याची उपासना कर. या विश्वाकडे स्थूल दृष्टीने पाहिले तर ते क्षणभंगुर भासेल पण सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर ते नाशवंत विश्व 'अक्षराने' (नित्यतत्व) पेललेले आहे हे कळेल. एकात्मता - परातत्व-ज्ञान एकच. ज्ञान-विज्ञान मिळून जीवनाचा पूर्ण योग. तो आनंददायी सुखकर मोक्षप्रद आहे. ही राजविद्या रहस्यमय गूढ असली तरी हे 'गीता रहस्य' भगवंताने सर्वांसाठी उघडे-खुले केले आहे.

बुद्धीने चिकित्सेने 'परतत्वाचा शोध' घेत जाणे हा मार्ग दूरचा व कष्टाचा. त्यापेक्षा भावनेने विश्वव्यापक परमात्म्याला गळामिठी मारता येते भावना विश्वाशी तादात्म्य करते परमात्म्याची साक्षात अनुभूती देते.

'मन्मना भव मुद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामे वैस्यसि युक्तैवमात्मानं मत्परायण: ॥ ९ : ३४

परमात्मतत्वात मन, भावना (भक्ती) प्रयत्न, चिंतन असे अखंड तादात्म्य ठेव तर त्या तत्वात प्रवेश ही सहज होईल. हीच ती रहस्यमय राजविद्या.

काळात आणि आकारात घेतलेले परमात्म दर्शन म्हणजे - विश्व. तर काळातीत व आकारातीत घेतलेले विश्वदर्शन म्हणजे परमात्मा !

'यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७
शुभाशुभ फलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनै: ।
संन्यास योगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैस्यसि ॥२८

ध्यान-तप-जप काहीच जमणार नसेल तर ही सोपी युक्ती तुला सांगतो हे कौन्तेया, तू जीवनात जे करतोस, खातोस, पितोस, हवन करतोस, दान देतोस, तप करतोस ते सर्व मला अर्पण कर. यामुळे तू शुभाशुभ फलरुपी कर्मबंधनातून मुक्त होशील आणि कर्मफलाचा संन्यास करण्याचा योग त्याने तू युक्तात्मा होऊन (म्हणजे शुद्ध अंत:करण आणि मुक्त) मला येऊन मिळशील.

हे दोन्ही श्लोक ९ व्या अध्यायाचे सार आहेत.

**आशा भिडे**
बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४१ ०१४०

## गीतेतील तत्त्वज्ञानाविषयक संकल्पना

या संकल्पना शोधून त्यांचा सोपा मराठीत अर्थ विषद करून सांगणारा एक प्रकल्प ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विद्यार्थीनीने बनविला आहे. हा प्रभाव विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात आहे. **वैशाली गोलतकर** हे या विद्यार्थीनीचे नाव आहे. गीतेत रस असणाऱ्या अभ्यासकांना हा प्रकल्प अतिशय उपयुक्त आहे. इच्छुकांनी विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात येऊन हा प्रकल्प पहाण्यास हरकत नाही. हा प्रकल्प ग्रंथालयाबाहेर मात्र दिला जाणार नाही.

**- ग्रंथपाल**

# खाड्या, नदीमुखे व तिवरे - प्रदूषण व संवर्धन

*नोव्हेंबरमध्ये आमच्या महाविद्यालय परिसरात झालेल्या राष्ट्रीय परिषदेचे प्रमुख कार्यवाह, बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागातील ज्येष्ठ प्राध्यापक व दिशाचे जुने वर्गणीदार डॉ. आठल्ये सर यांचा हा परिषदेतील विषयावरील महत्त्वपूर्ण लेख - संपादक*

खाड्या व नदीमुखे यांचे वैशिष्ट्य असे की भरतीच्या वेळी समुद्राचे खारे पाणी त्यांच्यात शिरते व ओहोटीच्या वेळी परत जाते. खाऱ्या गोड्या पाण्याच्या होणाऱ्या मिश्रणामुळे खाड्या व नदीमुखांच्या भागात विविध क्षारता असलेले विभाग तयार होतात. समुद्राकडच्या भागात क्षारता अधिक असते तर वरच्या, नदीकडच्या भागात क्षारता कमी असते. समुद्रातून व नदीतून विविध प्रकारचे प्राणी त्यांना सोयिस्कर क्षारतेच्या क्षेत्रात स्थायिक होतात. भरती ओहोटीबरोबर बदलणाऱ्या क्षारतेशी जमवून घेताना त्यांना जरी त्रास झाला तरी त्याच्या बदल्यात त्यांना समुद्रातील गर्दी, जीवघेणी स्पर्धा व शत्रूंपासून संरक्षण मिळते.

खाड्या व नदी मुखांच्या भागात समुद्राच्या मानाने लाटांचा जोर कमी असतो व पाणी शांत असते. त्यामुळे नदीने आणलेला पोषक द्रव्ययुक्त गाळ व चिकणमाती यांचे थर किनाऱ्यावर साठतात. या चिखलात तिवरांच्या वाढीस पोषक वातावरण असल्याने तिवराची झाडे बसती करतात. झाडांची मुळे माती धरून ठेवतात व चिखल गाळाचे थर भराभर वाढतात. यामुळे हळूहळू तिवरांचे जंगलच तयार होते. झाडांचा पालापाचोळा चिखलावर पडून कुजतो व पोषक द्रव्यांची भर पडत जाते. वरील विविध कारणांमुळे खाड्या, नदीमुखे व काठांवरील तिवरांमध्ये विविध प्रकारच्या वनस्पती व प्राण्यांची मुबलकता असते.

समुद्रातील विविध माशांचे प्रकार खाड्या, नदीमुखे व तिवरांच्या परिसंस्थेत प्रजोत्पादनासाठी येतात व अंडी घालतात. त्यांची पिल्ले या बऱ्याच अंशी संरक्षित परिसंस्थांमधे वाढतात व मोठी झाल्यावर समुद्रात जातात. तसेच ज्या माशांना क्षारतेतील बदल काही काळासाठी सोसतात ते भरतीबरोबर आत येतात व पोटभर अन्न खाऊन परत जातात. अशा रीतीने खाड्या, नदीमुखे व तिवरे समुद्रातील मासे, झिंगे यांच्यासाठी अन्न मिळण्याची व प्रजोत्पादनाची स्थाने आहेत, ज्यांच्या योगे समुद्रातील मत्स्योत्पादनाची वाढ होते.

ठाणे-मुंबईचा भूभाग उल्हास नदी, ठाणे खाडी व अरबी समुद्र यांनी वेढलेला असल्याने काही दशकांपूर्वी ठाणे खाडीच्या व उल्हास नदीच्या अगदी वरच्या भागात देखील भरपूर मासे, झिंगे, खेकडे यांची रेलचेल होती. परंतु गेल्या २० वर्षात या भागातील मत्स्योत्पादन लक्षणीय प्रमाणात घटले आहे. या भागातील बेसुमार औद्योगिकीकरण, कारखाने व शहरीकरणामुळे असे झाले आहे असे आपण मानतो. परंतु या परिसंस्थाकडे आपण करीत असलेले दुर्लक्ष, त्यांची हेळसांड आणि योग्य कार्यवाही करण्यासाठी लागणाऱ्या इच्छाशक्तीचा अभाव ही त्यांच्या ऱ्हासाची खरी कारणे आहेत.

विद्याप्रसारक मंडळाचे बा.ना.बांदोडकर महाविद्यालय ठाणे खाडीच्या किनाऱ्यावर व उल्हास नदीपासून जवळ असल्याने या दोन्ही परिसंस्थाचा सम्यक अभ्यास करणे हे आपले कर्तव्यच आहे असे आम्हाला वाटल्याने डॉ. सौ. कुसुम गोखले यांच्या मार्गदर्शनाखाली प्राणिशास्त्र विभागात १९८० मध्ये ठाणे खाडी व उल्हास नदीवर काम सुरु झाले. तेव्हापासून आजवर आमच्या विभागाने या परिसंस्थाच्या अभ्यासाचे २ मोठे व १ लहान

असे ३ प्रकल्प पूर्ण केले आहेत. सध्याही मुंबई महानगर विभागाच्या पर्यावरण सुधार संस्थेच्या सहाय्याने ठाणे खाडी व उल्हास नदीवर एक अभ्यास प्रकल्प सुरू आहे. या परिसंस्थाचा NIO, BARC, CMFRI, NEERI, MPCB इत्यादी राष्ट्रीय संस्थांनी सखोल अभ्यास केला आहे. परंतु आम्ही हा अभ्यास वरचेवर करीत राहिल्याने या परिसंस्थाचा कसा कसा ऱ्हास होत चालला आहे हे आमच्या प्राकर्षाने लक्षात येत आहे आणि याकडे आपण सर्वांनी लक्ष देणे जरूर आहे. कारण या ऱ्हासाला आपण सारे येथले रहिवासीच जबाबदार आहोत.

खरंतर खाड्या व नदीमुखाच्या भागात आपण सोडत असलेली प्रदूषके भरती ओहोटीबरोबर समुद्राकडे वाहून नेली जातात. परंतु त्यांचा हा गुणच त्यांना मोठा मारक ठरतो आहे. आपण त्यांच्या आजूबाजूला इतके कारखाने वाढू दिले आहेत व शहरांचा विस्तार केला आहे की प्रदूषकांचा भार त्यांना सोसेनासा झाला आहे. यात भर म्हणून की काय आपण खाड्यांच्या किनाऱ्यावर शहरातील घनकचरा टाकून त्यांची कचराकुंडी करून टाकली आहे. मातीचे भराव घालून रस्ते बांधणे, किनाऱ्यालगत बांधकामे करणे व पुलांची बांधकामे करताना भरती आहोटीचे प्रवाह अडणार नाहीत, अशी दक्षता आपण घेत नाही पर्यायाने आपण सोडलेली प्रदूषके समुद्राकडे वाहून नेण्याची खाड्यांची क्षमता कमी झाली आहे. यामुळे त्यांच्यात प्रदूषके व गाळ साचत चालले आहेत. ठाणे खाडी व उल्हास नदी या दोहोंबाबत असेच घडले आहे. आम्ही आजवर केलेल्या अभ्यासात पुढील महत्त्वाचे बदल आमच्या नजरेस आले आहेत.

१. पाण्यातील विरघळलेला प्राणवायू सरासरी २.५ मिलीग्रॅम प्रति लिटर पेक्षा कमी झाला आहे जे अत्यंत धोकादायक आहे.

२. पाण्यातील पोषक द्रव्ये प्रमाणाबाहेर वाढल्याने पाण्यातील सूक्ष्म वनस्पती व संधीसाधू जीव प्रमाणाबाहेर वाढले आहेत.

३. पाण्यातील तरंगणारे कण खूप वाढून पाणी सतत गढूळ राहते.

४. तिवरांची वने जाळण्यासाठी, शेत जमिनीसाठी किंवा मत्स्योत्पादक, तळ्यांसाठी तोडली जात आहेत किंवा कचरा टाकून बुजविली जात आहेत.

५. चिखलातील चिकणमाती कमी होऊन गाळाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे या भागातील झिंगे व निवटे पूर्णपणे हद्पार झाले आहेत:

पूर्वी ठाणे शहराजवळ भरपूर मासेमारी होत असे. आता कोळ्यांना खाडीत १५-१६ कि.मी. खालीपर्यंत मासेमारीसाठी जावे लागते.

उल्हास नदीच्या कल्याण-डोंबिवली-मुंब्रा भागात काही प्रमाणात अशीच परिस्थिती आहे. ठाणे-मुंबईतील प्रत्येकजण, ठाणे, मुंबई, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कारखाने व सरकार सगळेच या ऱ्हासाला जबाबदार आहोत.

माननीय राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम म्हणतात त्याप्रमाणे आपण स्वयंशिस्तीने, काटेकोर नियमांचे पालन करून प्रामाणिक प्रयत्न केले तर या दोन्ही पूर्वी संपन्न असलेल्या परिसंस्थांचे आपण पुनरुज्जीवन करू शकू. त्यासाठी वैयक्तिक रित्या व एकत्रितपणे पुढील गोष्टी आपण करू शकतो.

अ) <u>वैयक्तिकरीत्या करण्याचे उपाय</u> :-

१. घरात साठणारा ओला कचरा काम्पोस्ट पद्धतीने कुजवून त्यापासून उत्तम खत बनविता येईल. यामुळे घनकचऱ्याचे प्रमाण ४० ते ५० टक्क्यांनी कमी करता येईल.

२. खाड्या, नदीमुखे, तिवरे व आपले पर्यावरण यांचे

संरक्षण व संवर्धन करण्याचे महत्त्व व ते कसे करावे याबाबत आपण इतरेजनांना शिक्षित करू शकतो.

ब) समाज म्हणून एकत्रितपणे करावयाचे उपाय :-

१. आंघोळीसाठी व कपडे धुण्यासाठी वापरले जाणारे पाणी स्वतंत्र टाकीत साठवून त्याचा संडासाच्या फ्लशसाठी पुनर्वापर करणे ज्यामुळे पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टळेल व सांडपाण्याचेप्रमाण कमी होईल.

२. शौचकूपांसाठी पूर्वीची सेप्टिक टँकची पद्धत पुन्हा सुरू करता येईल. सेप्टिक टँकमधून पोषक द्रव्ये असलेले खत मिळेल व खाड्या, नद्यांमध्ये सोडावयाच्या सांडपाण्यामध्ये घट होईल.

३. न कुजण्यासारखा घन कचरा उदा. प्लॅस्टिक, टिन वगैरे वेगळा करून त्याचा पुनर्वापर करता येईल. ज्यासाठी महापालिकांनी आपल्या क्षेत्रामध्ये असे छोटे कारखाने उभारण्यासाठी प्रोत्साहन द्यावयाला हवे.

४. वरील उपाय योजूनही जो घनकचरा / सांडपाणी तयार होईल त्यावर योग्य प्रक्रिया करून व त्यातील घातक घटक कमी करूनच तो खाडी वा नदीमध्ये सोडणे.



उद्घाटन प्रसंगीचे दृश्य

५. खाडी व नदीमुखाच्या भागात साठलेला कचरा, गाळ काढून टाकून भरती ओहोटीचे पाणी विना अडसर वाहू देण्यासाठी उपाय करणे. यामुळे खाड्यांमध्ये सांडपाणी व कचरा साठून राहणार नाही.

६. खाड्या व नदीमुखाच्या किनाऱ्यांवर तिवरांची लागवड व संवर्धन करणे.या तिवरांची आलटून पालटून तोडणी केल्यास लाकूडफाटा उपलब्ध होईल. तिवरांचे फायदेही मिळतील व त्यांचे संवर्धनही होईल.

वरील सर्व उपाययोजना कुठल्याही प्रकारची दिरंगाई न करता, सबबी पुढे न करता व त्या सकृतदर्शनी जरी करण्यास त्रासदायक व खर्चिक वाटल्या तरी त्वरित अंमलात आणणे जरूरीचे झाले आहे. अन्यथा खाड्या, नदीमुखे, तिवरे व पर्यायाने समुद्रातील मत्स्योत्पादनाचा विनाश अटळ आहे.

वरील सर्व विषयांवर भारतभरामध्ये विविध ठिकाणी संशोधन होत आहे. अनेक शास्त्रज्ञ, पर्यावरणप्रेमी व्यक्ती व संस्था पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी प्रयत्नशील आहेत. या सर्वांना एकत्र आणून साधक-बाधक चर्चा करणे व त्याद्वारे योग्य उपाययोजनांचा आराखडा बनविणे यासाठी राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन २८ नोव्हें. ते ३० नोव्हें. २००२ या काळात करण्यात आले होते. सदर चर्चासत्रात तज्ज्ञ शास्त्रज्ञांची १६ व्याख्याने झाली व ६५ शोधनिबंध सादर करण्यात आले. अनेक मुद्यांवर सविस्तर चर्चा होऊन पुढील शिफारसी सरकारी यंत्रणाकडे पाठविण्याचे ठरले.

-: शिफारशी :-

१. खाड्या, नदीमुखांचा भाग व तिवरे यांचा विनाश शहरांच्या कारखान्यांच्या सांडपाण्यामुळे तसेच घनकचरा टाकल्यामुळे होत आहे. त्यामुळे

प्रदूषणकारी गोष्टी बंद कराव्या किंवा त्यावर मर्यादा घालावी. सर्वसामान्य लोक, राजकीय स्तरावर, उच्चभ्रू व अधिकारी वर्गात तसेच न्यायसंस्थेतील लोकांमध्ये पर्यावरण विषयक जाणीव वाढविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावेत.

२. भारताच्या किनारपट्टीवरील तिवरांच्या जंगलांची घट होत आहे. त्यामुळे जिथे जिथे तिवरे चांगल्या प्रमाणात अस्तित्वात आहेत. त्या भागांना संरक्षित करून तेथून तिवरांची रोपे मिळवून अन्यत्र लागवड करावी.

३. केंद्रीय व राज्यस्तरावर बिगर सरकारी किंवा तत्सम उच्चाधिकार समिती स्थापन करावी जी खाड्या, नदीमुखे व तिवरे यांच्या आसपास शहरांच्या व कारखान्याच्या वाढीवर लक्ष ठेवून योग्य उपाय करील.

४. किनारपट्टीच्या भागात तिवरांची (खारफुटीची लागवड करून त्यांचा हरितपट्टा विकसित करावा. या कामासाठी स्थानिक लोकांना प्रशिक्षित व प्रोत्साहित करून त्यांचा सहभाग मिळवावा.

५. मुंबई जवळील ठाणे खाडी व उल्हास नदी मुखाचा भाग या परिसंस्था आधीच प्रदूषित झालेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या सभोवताली होणाऱ्या शहरीकरणाच्या व कारखान्यांच्या वाढीला परवानगी देण्यापूर्वी, या परिसंस्था किती प्रदूषकांचा भार सहन करू शकतात, हे तपासून त्यानुसार निर्णय घेतले जावेत.

६. जागतिक राष्ट्रांच्या संघटनेच्या (UNO ) विकास योजनेमधून जागतिक पर्यावरण निधी मिळवून अतिशय प्रदूषित अशा ठाणे खाडीला पुनरुज्जीवित करण्याचा कार्यक्रम राबवावा व एक आदर्श उदाहरण घालून द्यावे.

डॉ. र. प्र. आठल्ये

•••

(पान क्र. ५ वरून)

## नायजेरिया : अस्मितेच्या शोधात असलेला देश

निराशा जाणवते. या निराशेला मात्र सोनेरी कडा आहे. शिक्षक देश घडवू शकतील, याची त्यांना चांगली जाणीव झाली आहे. स्टॅनच्या वार्षिक अधिवेशनात ही बाब पदोपदी जाणवत होती. स्टॅनच्या अधिवेशनाला सरकार बरेच महत्त्व देते. शिक्षण मंत्र्याचा प्रतिनिधी आणि गव्हर्नरचा प्रतिनिधी पूर्ण वेळ अधिवेशनाला हजर रहातात. स्टॅनच्या अधिवेशनाला येणाऱ्या पाहुण्याचे आदरातिथ्य करतो. कित्येक जण आपल्या Visiting Card वर F-STAN (Fellow) किंवा M-STAN (Member) असा सार्थ अभिमानाने उल्लेख करतात. विश्वविद्यालय अनुदान आयोगाचा एक वरिष्ठ अधिकारी स्टॅनच्या अधिवेशनाला आलेले पाहुणे म्हणून सर्वत्र मानाची वागणूक मिळते. या सगळ्या गोष्टी शिक्षण व्यवसायाला दिलेले महत्त्व प्रतिपादित करतात. आपल्या देशातील मनुष्यबळाचा विकास कसा होईल, याचा शिक्षक संघटना विचार करीत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांना लवकरच यश येईल अशी आशा बाळगूया. नायजेरिया आम्हाला अस्मिता शोधणारा देश वाटला.

नायजेरिया मध्ये अनेकांना भेटल्यानंतर मनात आलेले विचार असे हा देश आपल्या नाशिकसारखाच आहे. नाशिकमध्ये एकच 'काळाराम मंदिर' आहे. येथे भेटणाऱ्या प्रत्येक कृष्णवर्णी माणसामध्ये शोधला - हुडकला तर नक्कीच राम सापडतो. तो फक्त प्रामाणिकपणे शोधला पाहिजे. म्हणजे आपण राम शोधायचा आणि त्या सर्व 'काळाराम'नी आपली स्वत:ची अस्मिता शोधायची. दोघांनाही शुभेच्छा देऊन हा लेख संपवतो.

डॉ. सुधाकर आगरकर
होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र
वि. ना. पुरव मार्ग, मानखुर्द,
मुंबई - ४०० ०८८.

•••

# श्रीमद् भगवत् गीता - विषय प्रवेश

*१५ डिसेंबर रोजी गीता जयंती साजरी केली जाईल. त्यानिमित्त गीतेचे एक अभ्यासक, व्यासंगी व ज्येष्ठ लेखक लेखक माननीय श्री. शंकरराव मठ यांचा हा लेख - संपादक*

**गीता ग्रंथ -**

गीतेचे तत्वज्ञान आज पाच हजार वर्षे उलटली तरीही जगाला मार्ग दाखवीत राहिले आहे. आज जगाला त्याची जितकी गरज आहे तितकी गरज क्वचितच कधी भासली असेल. हे तत्त्वज्ञान नित्य नूतन आहे. कधी जुने होत नाही. अशा अद्‌भुत ग्रंथाविषयी देखील आम्ही उदासीन आहोत. श्रीकृष्णाने जगाला मार्गदर्शन करण्यासाठी तत्वज्ञान समजावण्यासाठी गीता सांगितलेली आहे. त्यातील तत्त्वज्ञान इतके श्रेष्ठ आहे की आज जगातील सर्व धर्म ग्रंथात व तत्त्वज्ञानाच्या ग्रंथात तिला अग्रस्थान प्राप्त झालेले आहे. गीता दीपस्तंभाप्रमाणे तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन करायला उभी आहे.

समतोल जीवन निर्माण करण्याची प्रेरणा प्राप्त होते. सर्वांनाच दैनंदिन व्यवहार उन्नत व उदात्त करता येतात. मी परमात्म्याचा सेवक असून हातून घडणारे प्रत्येक कर्म ही त्याची पूजा होय. यातून कल्याण साधता येते. गीतेचा दृष्टिकोण व्यापक अतएव उदार स्वरुपाचा आहे. केवळ एकट्याने कल्याण साधून न थांबता सामाजिक कल्याणही साधावे. विशुद्ध चारित्र्य, सद्‌गुण संपन्न जीवन, आत्यंतिक कुशलतेने कर्म करण्याची हातोटी, या गोष्टीने विश्वात सौख्य निर्माण करता येईल. आपले स्वत:चे जीवन सर्व बाजूंनी फुलविता येईल. धर्म-व्यवहार, श्रद्धा-बुद्धी, नीति-तत्त्वज्ञान, ध्येय-व्यवहार, ऐहिक-पारलौकिक या सर्वांचा मेळ घालून जीवन सर्वांगीण व सर्वंकष बनवता येईल, असे प्रतिपादन करणारा हा ग्रंथ आहे.

प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्यामधील झोंबाझोंबी अनादीकालापासून चाललेली आहे. जेव्हा प्रवृत्ती व निवृत्ती मध्ये समन्वय घडतो तेव्हाच मानवाला समाजाच्या विकासाची उंची गाठता येणे शक्य आहे. केवळ निवृत्तीवादी वा केवळ प्रवृत्तीवादी वा केवळ प्रवृत्तीवादी व्यक्ती अथवा समाज, विकास करू शकत नाहीत. **विकास हा समन्वयानेच साधता येतो. श्रीकृष्णाने गीतेत हेच तत्त्व सांगितले आहे. कोणत्याही गोष्टींचा अतिरेक होता कामा नये. हाच खरा विकासाचा मार्ग.** मानव हा मार्ग स्वीकारून चिरकाल उन्नती साधू शकतो, अशा विकासाकरता योग्य मार्ग दर्शक ग्रंथ म्हणजे, तो एकमात्र गीता ग्रंथ होय.

**वैज्ञानिक दृष्टी :-**

सत्यान्वेषण हा हेतू साधण्यासाठी वैज्ञानिकात प्रखर बुद्धी, निष्ठा व तर्क कठोरता असावी लागते. वैज्ञानिक वस्तुनिष्ठ असतो. प्रत्येक गोष्ट तपासून घेईल, त्यावर प्रयोग करील, कुणाच्या मतावर अवलंबून न राहता प्रयोगातून जी काही प्रतीती येईल, त्याचा तो स्वीकार करतो. अर्जुनाच्या ठिकाणी ही दृष्टी होती. गीता ऐकण्यापूर्वी विशिष्ट विचार त्याच्या मनात होते. कृष्ण वचनाने त्याचे मन ढळले नाही. त्याचे समाधान झाले नाही. वारंवार प्रश्न विचारून तपासून पाहण्याचा प्रयत्न झाला. परंतु हा सारा शब्दांचा फुलोरा आहे, असे त्याला वाटले. विश्वरुप दर्शनाने त्याच्या मनातील साऱ्या शंका दूर झाल्या. मगच श्रीकृष्णवचनाचा त्याने स्वीकार केला.

**बुद्धीयोग :-**

कर्म बंधनातून मुक्त होण्याची युक्ती म्हणजे बुद्धी योग. एषा तेऽभि हिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रुणु । बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्म बंध प्रहास्यसि । (२-३९) बुद्धीच्या

कक्षा रुंदावयास पाहिजेत. बुद्धि दैवी गुणाच्या आधारे प्रवर्तित व्हावयास हवी. वेद, गुरु, विद्वान हे सर्व केवळ मार्गदर्शक होत. याच्या पलीकडे ज्याचा त्याला प्रवास करावा लागतो. इदं ते ज्ञानं आख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया । विमृश्य एतत् अशेषेण यथेच्छसि तथा कुरु । (१८-१३) श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात - पार्था तुला साधकबाधक ज्ञान सांगितले आहे. त्याचा तू विचार कर व तुला योग्य वाटेल तसे वाग.

**गीतेची शिकवण सार्वजनीन व सार्वकालीन :-**

गीतेतील शिकवण अति व्यापक आहे. स्थल कालातीत आहे. अखिल भूत मात्राचे कल्याण गीतेला अभिप्रेत आहे. सर्व कर्म यज्ञमय करावं ही गीतेतील मुख्य शिकवण आहे. अन्यथा कर्मबंध अटळ. म्हणून आसक्ती वरहित कर्म कर. यज्ञार्थात् कर्मणोऽन्यत्र लोकोऽइयं कर्मबन्धन:। तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंग: समाचर । (३.९) असे कर्म सर्व लोकांच्या हिताला कारणीभूत ठरते. लभन्ते ब्रह्म निर्वाणं ऋषय: क्षीण कल्मषा: । छिन्नद्वैधा यतात्मान: सर्वभूत हिते रता: । (५.२५) अशी व्यक्ती पाप रहित होऊन आत्यंतिक कल्याण प्राप्त करून घेते.

**दु:ख पचविलेच पाहिजे :-**

जीवन सुख दु:खाने भरलेले आहे. सामान्य माणूस दु:खाने निराश होतो. गीता दु:ख पचवावयास सांगते. गीता अर्जुनाच्या विषादातूनच निर्माण झाली. साऱ्या कठीणतर प्रसंगाला धैर्याने तोंड दे. न शोभणारे वर्तन करण्याने अर्जुन, दुबळेपणा व्यक्त करतोस. क्षुद्रं हृदय दौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ परंतप । (२-३) मनाचा दुबळेपणा झटकून उठून उभा रहा व प्रसंगाशी दोन हात कर.

**दु:खाने खचू नका :-**

विश्व हे परमेश्वराचे विश्रांती स्थान आहे. दु:खाबद्दल परमात्म्याची निंदा करू नका. विश्वात अधिकतर दु:ख मानव आपल्या व्यवहारामुळे निर्माण करतो. सद्‌विचार व सदाचाराने दु:खे कमी करणे शक्य आहे. शिवाय दु:खे आवश्यकही आहेत. कारण सर्व सद्‌गुणांचा विकास करण्यास उत्तम संधी मिळते.

**कर्तव्य पालन-शाप नसून वरदान :-**

जीवन म्हणजे कठोर परिश्रम - कर्तव्य पालन. परिश्रम करणे हा मानवाचा मूलभूत हक्क आहे. कर्मणि एव ते अधिकार: । (२.४७) हेच कर्म संपूर्ण मनाने, आसक्ती विरहित करावे. कर्म फलाचे वितरण मानव सेवेत खर्ची घालावे. यालाच कर्मफल त्याग म्हणतात. तोच वैभव प्राप्त करून देतो. आध्यात्मिक जीवन उंचावतो. हा विशेष अधिकार न समजल्याने मानव दु:खी होतो. श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ज्ञानात् ध्यानं विशिष्यते । ध्यानात् कर्मफल त्याग: त्यागात् शान्तिरनन्तरम् । (१२.१२) प्रत्येकाचे जीवन दुसऱ्यावर अवलंबून असते. अनेक मेहनती व विचारी लोकांमुळे जीवन फुलते. अन्यथा पोकळी निर्माण होईल. वैज्ञानिक आपला शोध संपूर्ण मानव सुखी होण्यासाठी लावतो.

**दुष्ट प्रवृत्तीचा नाश करणेच योग्य :-**

मानवी जीवनात दुष्ट प्रवृत्ती भरपूर आढळते. ही केवळ आपल्या इच्छा मात्रे करून नष्ट होत नाही. दुष्ट प्रवृत्ती हे मानव अपूर्ण असल्याचे द्योतक आहे. संपूर्ण विश्व कधीच सदाचार संपन्न होऊ शकणार नाही. म्हणजेच पूर्णतेला पोहोचणार नाही. दुष्टता राहणार. त्याच्याशी धैर्याने दोन हात केले पाहिजेत. त्या संबंधीचे मार्ग - १) दुष्टतेला शरण जाणे २) दुष्टाचे मन परिवर्तन करणे ३) सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे ४) दुष्टाचा नायनाट करणे. अहिंसा हे एक उत्तम तत्त्व आहे. महात्म्याना याचे पालन शक्य. सामान्याना हे जमणार नाही. शिवाय दुष्ट प्रवृत्ती पोसली गेली तर त्याजकडून अनेकांची हिंसा घडत राहते. निरपराधी लोकांची हत्या थांबविणे, धर्ममार्गाने चालणे यासाठी श्रीकृष्ण सांगतात, दुष्टांचा नाश अनिवार्य आहे. *परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां । धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युग ।* (४७/८) मानवांनी दुष्ट शक्तीशी धैर्याने दोन

हात केलेच पाहिजेत. *उत्तिष्ठ युद्धाय कृत निश्चय: । (२.३७) उत्तिष्ठ यशो लभस्व । (११.१३) हतो वा प्राप्स्यसे स्वर्ग जित्वा वा भोक्ष्से महीम् । (२.३७) तस्मात् त्वं उत्तिष्ठ यशो लभस्व । जित्वा शत्रन् भुंक्ष्व राज्यं समृद्धम् । मयैवेते निहता: पूर्वमेव । निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् । (११.३३)* शत्रूची उपेक्षा कधी करू नकोस. दुष्ट प्रवृत्ती नष्ट करणेच योग्य.

**मृत्यू अटळ आहे :-**

ही जीवनातील एक दु:खद घटना वैश्विक स्वरुपाची असून ती अटळ आहे. मृत्यु म्हणजे नव जीवन. जीवनातून निर्माण होणारी घटना आहे. मृत्युमुळे जग नित्यनूतन व ताजेतवाने राहते. मृत्यू धैर्यानेच स्वीकारला पाहिजे. विवेकी माणसाला मृत्यूचे काही वाटत नाही. तो मृत्यूला वस्त्रांतर समजतो. व्यक्तिमत्वाचा नाश न होता उजाळा प्राप्त होतो. नवीन जोम, शक्ती, नवी संधी प्राप्त होतात. मृत्यूला घाबरणे अयोग्य, तो आपला मित्र आहे. *पण्डिता: न अनुशोचन्ति । (२.११) धीर: तत्र न मुह्यति । (२.१३) जातस्य हि ध्रुवो मृत्यु: । (२.२७)* अटळ गोष्टींसाठी शोक करणे अयोग्य.

**गीतेतील ईश्वर कल्पना :-**

ईश्वर सर्वत्र आहे. तो सगळ्यात व सगळे त्याच्यात समाविष्ट आहेत. विश्व हे त्याचेच व्यक्त रूप आहे. प्रत्येक विचार, कृती, शब्द हेही तोच आहे. या सर्वांचा उपयोग जन कल्याणासाठी करणे योग्य. जनसेवा, ज्ञानदान, औद्योगिक क्षमता, कुशल कर्म ही सारी त्याची सेवा होऊन जाईल. स्वे स्वे कर्मणि अभिरत: संसिद्धिं लभते नर: । (१८.४५)

**सगळेच मार्ग परमेश्वराकडे जातात :-**

सगळी शास्त्रे आवश्यक. प्रत्येक व्यक्ती वेगळ्या स्तरावरून प्रयत्न करते. साधना बदलण्याबद्दल कुठेही आग्रह नाही. ते आवडीनुसार होते. एक मात्र निश्चित सगळे मार्ग परमात्म्याकडेच जातात. *ये यथा मां प्रपद्यन्ते तां स्तथैव भजाम्यहं । मम वर्त्म अनुवर्तन्ते मनुष्या: पार्थ सर्वश: । (४.११)* ठोकळेबाजपणा इथे बिलकूल चालत नाही. समानता ऐवजी एकात्मता अभिप्रेत आहे. ईश्वर समानतेचा ठोकळा नाही. यो यो यां यां तनुं भक्त: श्रद्धयार्चितुं इच्छति तस्य तस्य अचलां श्रद्धां तामेव विद्धाम्यहम् । (७.२१) श्रद्धेने कोणत्याही विग्रहाची आराधना करावी, ती सर्व परमात्म्याचीच पूजा ठरते.

**कार्यकारण भावाचा उगम :-**

निसर्गात सर्वत्र सुव्यवस्था आढळते. संतुलन हा स्थायी भाव हे गृहीत धरून वैज्ञानिकानी नियम बांधले. नियमितपणामुळे अटकळ बांधली. आंब्याच्या कोयीपासून आंब्याचेच झाड उगवते. यात बदल होत नाही. मानवी हेतूला याच गोष्टीने कर्म सिद्धान्त जन्माला घातला गेला. हाच नीतितत्वाचा पाया. अशा प्रकारे कार्यकारण भाव निश्चित केला गेला. प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्माला जबाबदार. स्व प्रयत्नाने ती उन्नत वा अवनत होते. स्वत:चे जीवन घडविणे स्वत:च्याच हाती आहे. उद्धरेत् आत्मनात्मानम् । ६.५ सर्व शक्तिमान प्रभु यात ढवळाढवळ करत नाही. नादत्ते कस्यचित् पापं न चैव सुकृतं विभु: । अज्ञानेन आवृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तव: । ५. १५ सद्‌गुणाची महति कर्मसिद्धांतामुळे वाढते. मानवानी सतत उत्क्रांत होत राहिले पाहिजे, हेच कर्मसिद्धान्त शिकविते.

**विज्ञानाने एकत्वाची अनुभूति :-**

ऊर्जा व पदार्थ (एनर्जी व मॅटर) भिन्न नसून एकच आहेत. त्यांच्यात अदलाबदल करता येते. हा विचार वेदान्ताशी मिळता जुळता आहे. अन्नामुळे, जीव, शरीर, मन, भावना, विचार आदी पुष्ट होतात. अन्न जीवनदायी व शक्ती निर्मात्री आहे. म्हणजे अन्न हे माध्यम आहे. अन्नात् भवन्तिभूतानि । ३.१४ म्हणूनच ऋषि म्हणतात, परमात्म्यापासून सारे निर्माण झाले आहे. प्रत्येकात तो सुप्त आहे. लाकडात व तेलात प्रकाश उष्णता सुप्त आहे. योग्य वेळ येताच त्याची अभिव्यक्ती होते. माती, दगड, वीट यातही जीव व जाणीव सुप्त अवस्थेत आहेत. मात्र ती

पडताळून पाहाण्याची वैज्ञानिक उपकरणे नाहीत. देवात्म भाव पाहण्याचे हेच एकमेव कारण.

आणखी एक शक्ती -गुरुत्वाकर्षण - केंद्राकडे खेचणे, दूर टाकणे या शक्तीला माहीत नाही. ही शक्ती मानवात वेगळ्या स्तरावर कार्य करते. त्याचे नाव प्रेम. प्रेमाने एकत्र नांदता येते. दूर लोटणे प्रेमाला माहीत नाही. दूर लोटणारी शक्ती द्वेष. सहकारिता, प्रेमामुळेच संभवते. प्रेम हाच खरा जीवनाचा पाया. ईश्वर प्रेम स्वरुपी म्हणून त्याकडे आपण खेचले जातो. सर्वाभूती प्रेम हीच सर्वत्र धर्माची शिकवण.

**सहकारिता - विविध आविष्कार :-**

केवळ ऐष आराम केवळ देव देव - अशा वृत्तीच्या व्यक्ती परमात्म्याचा तिरस्कार करतात. परमात्मा सर्वात आहे. सर्व निर्मितीबद्दल आदर बाळगून योग्य वर्तनाने त्याची आराधना करणे आवश्यक. प्रत्येक कर्म हे देव कर्म व्हावे. प्रार्थना, ध्यान, धंदा, उदीम, उद्योग यानी त्याची सेवा झाली पाहिजे. हा शुद्ध भाव. यातून सहकारितेचा नियम उदय पावतो. उभयतात सुसंबद्धता, आवश्यक तरच एकमेकांचे कल्याण साधता येते. या संघटित प्रयत्नाला यज्ञ म्हणतात. जगाच्या कल्याणासाठी कार्य करण्याल.लोकसंग्रह म्हणतात. चातुर्य व शक्तीने संपादन केलेल्या गोष्टी कमनशिबी व गांजलेल्यांना वितरण करणे हाच फलत्याग. अशी आनंदाने ईश्वर सेवा करणे हेच निर्हेतुक कर्म. त्यातून समाज कल्याण म्हणजे ईश्वर सेवा होय.

**योग व त्याची वैशिष्ट्ये :-**

गीता योग शास्त्र आहे. अठरा अध्यायात अठरा योग आहेत. अर्जुना, तू योगी हो असे श्रीकृष्ण सांगतात.

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि ततोऽधिकः ।
कर्मिभ्यःच अधिको योगी तस्मात् योगी भवार्जुन ।

कर्णिभ्यः च अधिको योगी तस्मात् योगी भवार्जुन । योगाचे अनेक अर्थ संभवतात. १) परमात्म्याशी संबंध जोडणे २) सख्यत्व निर्माण करणे. ३) इतर मार्गाने परमात्म्याशी नाते जोडणे. यात अनेक प्रकारच्या साधनांचा समावेश केला जातो. परमेश्वराशी जवळीकता साधल्याने दैवी गुणांचा ओघ वाढेल. जीवन सुंदर उदात्त उत्तुंग होईल. योगाविरुद्ध जो शब्द आहे, त्याला संग म्हणतात. जीव व ईश्वर सांगड हा योग, मन व बाह्य पदार्थ यांची सांगड हा भोग. पहिल्याला युक्त म्हणतात, तर दुसऱ्याला सक्त म्हणतात. सक्ताला युक्त करणे हे योगाचे काम. गीतेतील योगाची व्याख्या - १) योगः कर्मसु कौशलम् २) समत्वं योग उच्यते.

**योग सतत आवश्यक :-**

जीवन अनेक प्रसंगांनी युक्त. जितके प्रसंग तितके योग. योग हे जीवन सूत्र आहे. नित्य युक्त असणाऱ्यालाच योगी असे म्हणतात. ती श्रेष्ठ अवस्था आहे. ईश्वराशी नित्य अनुसंधान हेच गीतेतील ज्ञान. ध्यान, प्रार्थना. विशिष्टवेळी मात्र परमात्म भाव सदोदित पाहिजे. अर्धवेळ सेवा चाकरी संभवते. अर्धवेळ भक्ती व इतर वेळी स्वैर आचरण अभिप्रेत नाही. गीता सांगते - तस्मात् सर्वेषु कालेषु मां अनुस्मर युध्यच । माशी बनू नका. मधमाशी व्हा. म्हणून सर्व काळ परमात्म भाव का आवश्यक हे लक्षात घे.

**ऐहिक पारलौकिक :-**

दैवी जीवनासाठी प्रयत्न, त्यासाठी संपूर्ण जीवन दैवी होणे आवश्यक. या कारणाने स्व कर्मणा तं अभ्यर्च सिद्धिं विन्दति मानवः । १८.४५ शिक्षक असाल - ज्ञान दान करा, डॉक्टर असाल - रोग बरे करा, कामगार असाल - कुशल व उत्कृष्ट प्राविण्याने काम करा, कोणत्याही क्षेत्रात असाल त्या अवस्थेतून सर्वांच्या हिताचे होईल, असे वागणे हाच योग. जप व ध्यानाने साध्य होणारी गोष्ट, याही गोष्टी निर्हेतुक केल्यास साध्य होतील. समाज सेवा, धर्माचरण, एकमेकांना पूरकच आहेत. मात्र उदात्त हेतूने दोन्हींचे आचरण आवश्यक, हीच खरी धर्मसाधना. ऐहिक पारलौकिक कृत्रिम भेद न करता शुद्ध कर्म करा.

संपत्ती संग्रह वाईट नाही. त्याचा तिरस्कार करून

त्याग करण्यापेक्षा उपभोग त्याग महत्त्वाचा. मालकी हक्काचा त्याग करून विश्वस्त बना. इहलोक परलोकाहून वेगळे नाही. सद्‌हेतू हा महत्त्वाचा. निःस्वार्थ शुद्ध हेतूने भगवंताचे सेवक म्हणून कर्म करा. वेतन वा द्रव्यप्राप्ती भगवंताचा प्रसाद माना. त्यात सर्वांचा वाटा आहे. कारण प्रसाद वाटूनच खावयाचा असतो. याप्रमाणे संपूर्ण जीवन यज्ञमय होईल.

**वासना रहितता :-**

वासनांवरील जय संपादन आवश्यक. त्या दवबून टाकणे योग्य नाही. त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक व शक्य आहे. धर्म अविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ । ७.११ वासना उत्तम असल्यास जगाचे कल्याण साधता येते. वासनांवर नियंत्रण कसे ठेवता येईल ? १) वासना दडपणे २) चुचकारणे ३)उदात्त करणे. जनहित विरोधी वासनांचा निर्दयतेने नायनाट करा. संगति दोषाने वासना उद्दाम झाल्या असतील तर त्याना चुचकारा व मार्गावर आणा. वासना नेहमी उदात्त करण्याकडे कल ठेवा. सदा मे मनः शिवः संकल्पमस्तु । ही धारणा हवी त्यातून समाज कल्याण साधता येईल. ऐहिक गोष्टींबद्दल बऱ्याच गैर समजुती आहेत. अध्यात्म मार्गातील अडथळा असा एक समज आहे. त्यामुळे आपले ऐहिक जीवन उद्ध्वस्त झाले आहे. जीवनाचे डबके बनले आहे. परिश्रम, कला कौशल्य यांची हेळसांड झाली व दारिद्र्य मात्र जवळ केले. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' ही संतांची शिकवण विसरलो. संपत्ती वाईट नाही. मात्र त्याचा विनियोग जनहितासाठी होणे आवश्यक. मनाचा दुबळेपणा म्हणजे स्वार्थ. तो झाकण्यासाठी संपत्तीच बागूला करणे हे अयोग्य आहे. मात्र शुद्ध मनाने उत्तम व्यवहार करून उत्कृष्ट धडा देणे आवश्यक. या प्रकारे यशस्विता प्राप्त करावी. सर्व कर्म, सर्व काही ईश्वराचे पूजन मानावे.

**गीता जीवन गाथा :-**

**गीता हा धार्मिक ग्रंथ नाही. समग्र जीवनाचा ग्रंथ आहे.** आपले संपूर्ण जीवन दैवी करता येते. मी देवाचा सेवक आहे, या भावनेने वाटेला आलेल्या कर्तव्य पालनाने देवाची पूजा बांधावी व कल्याण प्राप्त करून घ्यावे. हे अत्यंत भावपूर्ण आणि कुशलतेने करावे. मानवी जीवन भौतिक स्तरावरून उठले पाहिजे. कुशलतेने व ज्ञानपूर्वक केलेले प्रत्येक कर्म पूजाच ठरते. अध्यात्म व भौतिक कर्मे पूरक आहेत. उत्साहाने ही कर्मे जगाच्या कल्याणासाठी केली पाहिजेत. प्रत्येक कर्म ईश्वराची पूजा या स्वरूपात व्हावी. स्वार्थ प्रेरित होऊन होणारे कर्म अशुद्ध भाव निर्माण करते. अंतःशुद्धीसाठी निःस्वार्थ भाव आवश्यक असून त्यातून आपल्या बरोबर इतरांचेही कल्याण साधावे. हे करण्यासाठीच आपण सतत प्रयत्नशील रहावे हीच गीतेची शिकवण.

अधिकारापेक्षा कर्तव्य श्रेष्ठ होईल तेव्हाच जीवन संघर्ष संपेल. जीवन विशाल होईल, उन्नत होईल. प्रत्येक विचारामागे ईश सत्तेच्या अस्तित्वाची जाण आवश्यक आहे. ती असेल तर धर्म नीति यांचा आवर्जून विचार राहील. त्यातून कर्तव्य जाणिवेची प्रेरणा मिळत राहील. निरपेक्ष बुद्धीने कर्तव्य करण्याची अभिरुची राहते. उन्नतीचे मार्ग दर्शन अशा विचारामुळे होऊ शकते. समाजात नैतिक व सांस्कृतिक निष्ठा वाढीला लागेल. जो मानव स्वकर्तव्य पालन करीत नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे. गीता सांगते 'अघायुः इंद्रियारामः मोघं पार्थ स जीवनी । भौतिकता हक्काला प्राधान्य देते तर सांस्कृतिक जीवन कर्तव्याची प्रेरणा देते. श्रीकृष्णाने या वैश्विक समस्येमागे ईश्वरीय अधिष्ठान देऊन नीती व सत्याने वागणारा, आत्मविश्वासाने वागणारा मानव निर्माण करण्याचा गीतेद्वारे विचार मांडला आहे. कल्याणकारी विचाराने वागणाऱ्यांची कधीही अधोगती होत नाही. न हि कल्याणकृत कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष,

राम मारुती रोड , ठाणे - ४०० ६०२.

दूरध्वनी : २५३३ २०३०

# 'श्रीरामचरित मानस' एक अद्वितीय ग्रंथ

हिंदी मधील अक्षर साहित्यात गणला जाणारा 'रामचरित मानस' हा ग्रंथ सर्व अर्थांनी महान आहे, वाचनीय व संग्राह्य आहे. या ग्रंथाचे महात्म्य व बालकांडातील काही दोहे प्राचार्य मुजुमदार सरांनी या लेखात स्पष्ट केले आहेत.

- संपादक

उत्तर भारतात फारच प्रसिद्ध पावलेला 'श्रीरामचरित मानस' या ग्रंथाची मराठी वाचकांना थोडी ओळख करून देण्याचा छोटासा प्रयत्न. खरं म्हणजे चार पानं लिहून या महान ग्रंथाची ओळख करून देणारा हा केविलवाणाच प्रकार आहे. महाकवी 'तुलसीदास' यांनी या ग्रंथाची निर्मिती केली आहे. भारतात 'रामभक्ती' ही फारच प्रचलित आहे. कारण खऱ्या अर्थाने रामाची प्रतिमा एक आदर्श पुरुष म्हणूनच सर्वांना ठाऊक आहे. वाल्मिकी ऋषी पासून तर अगदी ग.दि. माडगूळकरांपर्यंत अनेक कवींनी रामचरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला. या प्रत्येक कवीचे लिखाण सर्व जनमानसात उत्स्फूर्तपणे स्वीकारले गेले आहे. म्हणून अजूनही सुधीर फडक्यांचे गीतरामायण श्रोते तल्लीन हाऊन ऐकतात. त्याला कारण गदिमांची प्रासादिक लेखणी अथवा सुधीर फडक्यांचा आवाज हा वादाचा विषय असूच शकत नाही. हे दोघेही एकमेकांना पूरक आहेत. पण फडक्यांच्या ऐवजी दुसरा गायक असला तरीही रामायण स्वीकारले जातेच. कारण गदिमांच्या राम भक्तीचा ओथंबलेल्या वाणीचा प्रभाव आहेच. थोडक्यात रामकथा हा फारच सुखद अनुभव आहे.

त्याच तोडीचा 'श्रीरामचरीतमानस' हा ग्रंथ आहे. पण तो हिंदी भाषेत असल्यामुळे त्याचा प्रचार महाराष्ट्रात हवा तसा झालेला नाही. पण या अद्वितीय ग्रंथाचे ज्यांनी वाचन केले त्यांनाच त्याची महती कळू शकते. भक्ती रसाने ओथंबलेल्या या ग्रंथाची आपल्या दैनंदिन जीवनात किती उपयुक्तता आहे, याची प्रचिती या ग्रंथातील काही दोहे आणि काही चौपाई यांचा विचार केल्यास आपणास कळू शकते. संदर्भहीन असल्यामुळे कदाचित हे दोहे व चौपाई समजण्यास अवघड वाटतील. पण एक अद्वितीय संदेश म्हणूनही त्यांच्याकडे बघणे सयुक्तिक होईल. दुसरी महत्वाची बाब म्हणजे उच्च प्रतीचे हिंदी वाङ्मय म्हणूनही त्याचा अभ्यास होणे योग्य ठरेल.

हा ग्रंथ कोणाला उपदेश करायला लिहिला गेला नाही. सुरुवातीलाच 'स्वांतसुखाय तुलसी रघुनाथ गाथा ॥ चौ. ७ ॥' असा उल्लेख येतो. याचा अर्थ स्वत:च्या सुखासाठी रघुनाथाची गाथा त्यांनी लिहिली आहे. स्वत:च्या सुखासाठी गायलेले ते 'संगीत'. त्यातलाच हा प्रकार आणि म्हणूनच तो अजोड, अवीट गोडीने भरलेला आहे. आपण जसजसे या 'मानसांत' जाऊ लागतो तसतसे असंख्य मोती आपल्याला मिळू लागतात. पण त्याकरिता खोलात अथवा समुद्राच्या तळाशी जाणे आवश्यक आहे.

प्रथमच सांगितल्याप्रमाणे आपण काही भागाचाच विचार करणार आहोत. त्यावरून जर आनंद अनुभवता आला नाही तर तो सर्वस्वी माझ्या लेखणीचा दोष असेल असे मी मानतो. पण हे चार दोहे वाचून एकदा तरी रामचरितमानस वाचण्याची इच्छा एखाद्या जरी वाचकाला झाली तरी माझ्या या प्रयत्नाला यश आल्याचा मला खूपखूप आनंद होईल.

इतर सर्व रामकथांमध्ये असलेले सात भाग या ग्रंथात सातकांड म्हणून लिहिले गेले आहेत. ते कांड 'बालकांड', 'अयोध्याकांड', 'अरण्यकांड', 'किश्किंधाकांड', 'सुंदरकांड', 'लंकाकांड' आणि 'उत्तरकांड' असे आहेत. ही सर्व कथा 'चार व्यक्तींमधील

संभाषणातून अथवा संवादातून पुढे सरकत आहे.

शंकर -पार्वती, याज्ञवल्क्य-भारद्वाज, काकभुसुंडी-गरूड, तुलसीदास आणि श्रोते या चार जोड्यांच्या संवादातून रामकथा वर्णिली गेली आहे.

या सात कांडातील काही दोहे आणि चौपाईंचा उल्लेख येथे करणार आहे. प्रत्येक दोहा अथवा चौपाई अवर्णीय आहे पण मला आवडलेले दोहे सादर करीत आहे.

**बालकांड :-**

सज्जन मनुष्य अथवा संतजनांची ओळख करून देताना तुलसीदास लिहितात -

सठ सुधरही सतसंगती पाई ।
पारस परस कुघात सुहाई
बिधी बस सुजन कुसंगत परही
फनि मनि सम निज गुन अनुसरही ।दौ. २ चौ. ५ ॥

दुष्ट जन सुद्धा सत्संगतीमुळे सुधारू शकतात. उदा. परिसाच्या स्पर्शामुळे लोखंडाचे सोन्यात रुपांतर होऊ शकते. त्याचबरोबर सज्जन मनुष्य दुष्टांच्या संगतीत आला तरीही तो आपला गुणधर्म बदलत नाही. जसे सापाच्या सान्निध्यात येऊन सुद्धा 'मणी' आपला प्रकाश देण्याचा गुण बदलत नाही.

सज्जनांबरोबरच दुर्जनाचे गुणधर्म ते वर्णन करतात.

बहुरी बंदी खलगत सतिभाए
जे बिनुकाज दाहिने बाए
परहीत हानि लाभ जिन्ह केरे
उजरे हरष निषाद बसेरे ॥ दौ. ३ चौ. १ ॥

दुष्ट माणसांना प्रणाम करतांना त्यांची लक्षणे ते सांगतात. आपले हित करणाऱ्या व्यक्तींच्या प्रतिकूलच ते वागत असतात. दुसऱ्यांची हानी अथवा अनहित हाच त्यांना स्वत:चा लाभ वाटतो. दुसऱ्यांचे निर्मूलन याचा आनंद व दुसऱ्यांचे वस्तान योग्य होणे याचे त्यांना दु:ख होते अशा माणसांना दुर्जन म्हणून ते संबोधतात.

पर अकाज लगी तनु परहरही
जिमि हिम उपल कृषी दल गरही ॥ दो. ३ चौ. ३ ॥

ज्याप्रमाणे गारा शेतात स्वत: गळून शेतीचा नाश करतात. त्याचप्रमाणे दुर्जन दुसऱ्याचा नाश करण्यासाठी स्वत:चा प्राण द्यायला मागे-पुढे बघत नाही.

वरील दोह्यांचा अनुषंगाने सज्जन अथवा दुर्जनांचे गुणधर्म आपल्याला समजतात. दुर्जनांचे गुणधर्म सोडून सज्जनांचे गुणधर्म अनुकरण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

हानि कुसंग सुसंगती लाहु । लोकहु बेद बिदित काहु
गगन चढई रज पवन प्रसंगा । कीचहीं मिलई नीच जलसंगा॥ दो. ६ चौ. ४ ॥

सुसंग अथवा कुसंग मिळाल्यास माणसाचे भले अथवा वाईट होऊ शकते. उदा. मातीचे छोटे कण वाऱ्यांत मिसळल्यास आकाशात पोहचतात पण तेच कण पाण्यात मिळाल्यास त्याचे रुपांतर चिखलात होऊ शकते.

धूम कुसंगती कारिख होई । लिखिम पुरान मंजु मसि सोई
सोई जल अनल अनिल संधाता । होई जलद जग जी बनदाता ॥ दो. ४ चौ. ६ ॥

कुसंगात पडून धूर त्रासदायक होऊ शकतो पण सुसंगती मिळून त्याच धुराचे शाईमध्ये रुपांतर होऊन त्याचा उपयोग पुराण लिहिण्यास केला जाऊ शकतो. तोच धूर, पाणी, अग्नि आणि वारा यांचा संगतीने बादल होऊन जगाला पाणी देणारा होऊ शकतो.

ग्रह भंवज जल पवन पट पाइ कुजोग सुजोग
होहि कुवस्तु सुबस्त जग लखहि सुलच्छन लोग॥ दो. ७॥

म्हणजेच ग्रह, औषध, पाणी, वायू आणि वस्त्र हे सर्व सुसंग अथवा कुसंग मिळून जगात चांगले अथवा वाईट पदार्थ होऊ शकतात.

जग बहु नर सर सरि सम भाई
जे निज बाढि बढहिं जल पाई

सज्जन सकृत सिंधुसम कोई
देखि पूर बिधु बाढइ जोई ॥ दो. ७ चौ. ७ ॥

जगात स्वत:ची उन्नती होताच प्रसन्न होणारे बरेच लोक असतात. हे सर्व लोक स्वत:ची पातळी वाढताच पूर येणाऱ्या नदी किंवा तलावांसारखेच असतात. पण वाढणाऱ्या चंद्राकडे बघून उधाण येणाऱ्या समुद्रासारखे सज्जन विरळेच असतात.

मंत्र महामुनि बिषय ब्यालके
मेटत कठिन कुअंक भाल के ॥ दो. ३१ चौ. ५ ॥

विषयरुपी सापाचे जहर उतरविण्यासाठी लागणारे मंत्र हेच आहेत. त्याचप्रमाणे स्वत:च्या नशिबात लिहिलेले वाईट विधी लेख या मंत्राच्या वाचनाने नाश पावू शकतात.

या ग्रंथाला 'रामचरितमानस' हे नाव का आले याचा खुलासा करतांना ते लिहितात -

रचि महेस नि मानस राखा
पाइ सुखमय सिवा सन भाषा
ताते रामचरितमानस बर
धरेऊ नाम हिये हेरि हरषि हर ॥ दो. ३४ चौ. ६॥

रामकथेची सुरुवात ही भारद्वाज मुनी आणि याज्ञवल्क्यमुनी यांच्या संवादाने होत ती पुढे नेली आहे. त्याचा उहापोह येथे करीत नाही पण दोघांचा आपण उल्लेख करीत आहोत.

संत कहहीं असि निती
प्रभु श्रुति पुरान मुनि गाव
होइ न विमल विवेक उर
गुरू सन किऐ दुराव ॥ दे. ४५॥

गुरू पासून कुठलीच गोष्ट लपवून ठेऊ नये. तसे केल्यास निर्मळ ज्ञान मिळू शकत नाही.

नही कोऊ अस जनमा जग माही
प्रभुता पाई जाहि मद नाही ॥ दो. ५९ चौ. ४ ॥

प्रभुत्व मिळाल्यावर मद न आलेला मनुष्य जगात जन्माला आलेलाच नाही हे सत्य ते सांगतात.

जधपी मित्र प्रभु पित गुरू गेहा
जाइअ बिंनु बोलेह संदेहा
तदपी विरोध मान जहँ कोई
तहा गएँ कल्याण न होई ॥ दो. ६१ चौ. ३ ॥

मित्र, गुरु, पिता आणि स्वामी यांच्या घरी न निमंत्रण येता सुद्धा जायला हरकत नसली तरीही जेथे विरोध आहे तेथे जाण्याने कल्याण होत नाही.

जधपी जग दारून दु:ख नाना ।
सबते कठीण जाती अवमाता ॥ दो. ६२ चौ. ४ ॥

जगात सर्वांत मोठं दु:ख हे स्वजातीचा अपमान आहे, असं ते लिहितात.

समरथ को नही दोस गुसाई ।
रवि पावक सुरसरी की नाई ॥ दो. ६८ चौ. ४ ॥

सूर्य, अग्नि अथवा गंगा नदी यांना कोणीच कसल्याच प्रकारचा दोष लावत नाही कारण ते सर्व समर्थ आहेत.

पराधीन सपनेहुँ सुख नाही ॥ दो. १०१ चौ.३ ॥

पराधीन व्यक्तीला कधीच सुख मिळत नाही.

तुलसी जसि भवितव्यता ।
तैसी मिलइ सहाय ॥
आपन आवई ताहि पहि ।
ताही तहा लै जाय ॥ दो. १५९ (ख)

तुलसीदास म्हणतात की जशी भवितव्यता आहे त्याचप्रमाणे प्रत्येकाला मदत मिळत जाते. हे योग माणसाच्या जवळ येतात अथवा माणसाला त्या ठिकाणी घेऊन जातात.

भरद्वाज सुनु जाई जब
होऊ विधाता बाम
धुरी मेरुसम जनक जम
ताही व्यालसम दाम ॥ दो. १७५ ॥(पान क्र. ३५ पहा)

# श्री विठ्ठल : पुंडरिकमुनी मनकुमुद विकास सुधाकर

प्राच्य विद्येचे अभ्यासक व नाणेतज्ज्ञ श्री. शशिकांत धोपाटे यांच्या शिलालेखां संदर्भातील हा लेख. त्यांनी केलेल्या आवाहनानुसार अभ्यासकांनी या विषया संदर्भातील ऐतिहासिक माहिती अवश्य कळवावी. - संपादक

सातारा जिल्ह्याच्या पूर्वभागातून 'माण' नावाची नदी वाहते. ही आता जरी ठिकठिकाणी कोरडी व क्षीण प्रवाही दिसत असली तरी एकेकाळी ती सुजलाम् व संजीवन दायिनी होती. इसवी सनाच्या चौथ्या शतकात राष्ट्रकूट वंशाच्या आद्य शाखेच्या 'मानांक' नावाचा राजाने याच नदीच्या काठी माण किंवा मानपूर नावाचे नगर वसवून आपली सत्ता स्थापन केली होती. या राजाना महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासाच्या अभ्यासकानी पूर्वकालीन राष्ट्रकूट अशी संज्ञा दिली आहे. यांचे अलिकडच्या शंभर-सव्वाशे वर्षात चार ताम्रपट मिळाले आहेत, त्यावरून त्याच्या दोन-एकशे वर्षांचा त्रोटक परंतु मनोरंजक इतिहास सिद्ध झाला आहे.

या मानांक राजाचे दुसरे नाव माणराज असेही एका ताम्रपटात नमूद झाले आहे. याचा नातू 'अविधेय' हा त्याच्या मानपूर याच राजधानीतून राज्य करीत असता त्याने कोल्लगिरीच्या पूर्वेस अने नदीच्या तीरावरील जाऊल व काम्यक या नावांच्या वाड्यासहित 'पांडरंगपल्ली' हे गाव भार्गव गोत्राच्या त्रिप्रवरी शंभू नावाच्या सामवेदी ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख, त्यानेच दिलेल्या एका ताम्रपटात आला आहे.

हा ताम्रपट बराच खराब अवस्थेत असून डॉ. कृष्णा या अभ्यासकानी जे प्रथम वाचन केले तेच आजही प्रचलित आहे. त्यानुसार पांडरंगपल्ली म्हणजे आजचे पंढरपूर. ज्याठिकाणी शंभू ब्राह्मणाचे नाव आले आहे तेथे त्यानी 'जयद्दिठ्ठ' असे वाचून विठ्ठल व पंढरपूर यांचे प्राचीनत्व इसवी सनाच्या पाचव्या शतकाइतके मागे जाते असे दाखवण्याचा प्रयत्न केला. परंतु प्राचीन इतिहासाचे दुसरे अभ्यासक महामहोपाध्याय मिराशी यांनी याच ताम्रपटाचा पुन्हा परिश्रमपूर्वक अभ्यास केला. ताम्रपटाची लिपी पाचव्या शतकातील ब्राह्मी असून भाषा फारच अशुद्ध संस्कृत आहे. शिवाय ताम्रपट कोरणारा सराईत व जाणकार नसावा. मिराशी यांनी त्यांनी काढलेल्या निष्कर्षातून असे दाखवून दिले की ज्याचे नाव डॉ. कृष्णा जयद्दिठ्ठ वाचतात ते तसे नसून शंभू असे आहे, पुढे ते असे सुचवतात की पांडरंगपल्ली हे आजचे पंढरपूर नसावे. तत्सम एखादे गाव सातारा जिल्ह्यात जावली तालुक्यात असावे. आज तत्सम गाव जावळी तालुक्यात नाही.

अगदी अलीकडे डॉ. हरिहर ठोसर यांनी कोल्लगिरी, अनेनदी, जाऊल व काम्यक यांची स्थान निश्चिती करून पांडरंगपल्ली हेच पंढरपूर असे दाखवले आहे. पण त्यात अडचण अशी की ताम्रपटाप्रमाणे दान दिलेले गाव पांडरंगपल्ली व वाड्यांजवळ जवळ असणे अपेक्षित आहे. पण पांडरंगपल्ली पंढरपूर तालुक्यात, जाऊल मोहोळ तालुक्यात तर काम्यक सांगोला तालुक्यात, तसेच ताम्रपटात भीमा नदीचा उल्लेख नाही, तसे पाहिले तर तीन संशोधकांचे तीन वेगळे निष्कर्ष. तरीही असे म्हणता येईल की, पांडरंगपल्लीचे पांडुरंगाशी साधर्म्य लक्षात घेता पंढरपुराशी काहीतरी संबंध असावा.

परंतु कृष्णा यांच्या जयद्दिठ्ठचा विठ्ठलाशी संबंध जोडता येत नाही त्याप्रमाणे पांडरंगपल्लीचा संबंध ज्याकाळात ताम्रपट दिला गेला त्या काळात तरी विठ्ठलाशी जोडता येत नाही. पांडरंगपल्ली व विठ्ठल या दोन शब्दांचा ऐतिहासिक मागोवा घेतला तर ध्यानात येईल की आजच्या पंढरपूरच्या विठ्ठल देवाच्या संदर्भात एकत्र कसे आले. एक मात्र नक्की की एखाद्याला दान देण्याइतपतच पांडरंगपल्ली

गाव छोटे होते.

शके बाराशते बारोत्तरी (म्हणजे इसवी सन १२९०) या वर्षी ज्ञानेश्वरी पूर्ण झाल्याचा लेखक सच्चिदानंदबाबा यांचा ज्ञानेश्वरीतील उल्लेख या यादव सम्राट रामचंद्र यांच्यासाठी ज्ञानेश्वरानीच योजलेल्या गौरवपूर्ण ओव्या आपणास ज्ञानेश्वरांच्या कालासंबंधी निश्चित माहिती उपलब्ध करून देतात. त्याला पंढरपुरातच वास्तव्यास असलेल्या नामदेव, जनाई आदी संतांच्या अंभागात आलेले काल संदर्भ मिळते जुळते असून हे संत समकालीन आहेत. या काळात वारकरी पंथाची ध्वजा चांगलीच उंचावली होती व विठ्ठल आणि पंढरपुरास अनुक्रमे देवत्व व तीर्थ महात्म्य प्राप्त झाले होते. अर्थातच या काळाच्या आधी आपण मागे कोठवर जाऊ शकतो ते शोधणे मनोरंजक ठरेल.

पंढरपुरातच "चौऱ्याऐशीची शिळा" म्हणून एका शिलालेख आहे. तो या इतिहासाचा महत्त्वाचा टप्पा स्पष्ट करतो. जीर्णोद्धार अथवा विस्तार किंवा दोन्ही करण्यासाठी या विठ्ठल मंदिरास लहान-मोठ्या ज्या देणग्या मिळाल्या, त्या देणाऱ्यांची नावे, देणगीचा प्रकार व ती दिल्याची तिथी, वार, मास व संवत्सर यांची नोंद या लेखात आहे. प्रमुख देणगी यादव सम्राट रामदेव यांची आहे. शिवाय सामान्य स्त्री-पुरुष, नागरिक, सरकारी अधिकारी, व्यापारी यांच्याही नोंदी आहेत. यामध्ये शके ११९५ (इ.सन.१२७३) हे सर्वात आधीचे व ११९९ (इ.स.१२७७) हे सर्वात शेवटचे वर्ष नोंदले आहे. म्हणजे यावेळी या दैवताला राजमान्यताही प्राप्त झाली होती. याच्याही आधीचा लेख शक ११७० (इ.स. १२४८), कीलक संवत्सर, पौष शुद्ध नवमी, शुक्रवारचा आहे. तो धारवाड जिल्ह्यातील हेब्बा या गावात आहे.या समयास रामदेव यादवाचा चुलता कृष्णदेव राज्यावर होता. पंडरगेच्या विठ्ठलदेवाच्या 'एकादशीच्या बारी' साठी एका ब्राह्मणास वृत्ति दिल्याची माहिती आपणास मिळते. वारी संबंधीचा उल्लेख असलेला व ज्ञानेश्वरांच्या आधी चाळीस वर्षापूर्वीही ती चालू होती हे सांगणारा आज तरी हा एकमेव कोरीव लेख.

सोलापूर गॅझेटीयरमध्ये एकोणिसाव्या शतकात केवळ त्रोटक व जुजबी संदर्भ दिलेला एक शिलालेख पंढरपुरातच विठ्ठल मंदिरात आहे. सोळखांबी मंडपाच्या पूर्वेकडच्या दरवाजासमोर असलेल्या तुळईवर तो असून तुळईच्या तिन्ही बाजूवर कोरलेला आहे. लेखाची लिपी तेराव्या शतकात प्रचलित असलेली देवनागरी आहे आणि भाषा मात्र संस्कृत व कानडी अशी आहे. लेखाचा उद्देश पंढरपूरच्या विठ्ठल देवाच्या अंगभोग व रंगभोग यासाठी आसंदीनाड मधील हिरयगरंज अग्रहाराचे दान हा आहे. संपादनास अतिशय कष्टमय, दुर्वाच्य अशा या लेखाचे ग.ह.खरे यांनी वाचन करून अभ्यासकाना मोलाची ठेव उपलब्ध करून दिली आहे. इतर कोणी अभ्यासकानी या लेखाची दखल घेतलेली माझ्या आढळात नाही. त्यांच्या संपादनाचा सारांश असा

१) होयसाळ राजा सोमेश्वर (इ.स. १२३५-१२५३) याचे हे दानपत्र.

२) असंदीनाड हा सध्याच्या म्हैसूर राज्यातील तत्कालिन होयसाळांच्या ताब्यातील एक प्रदेश.

३) पंडरंगेच्या (पांडरंगपल्लीच्या) म्हणजे पंढरपूरच्या विठोबासाठी दान.

४) पंडरंग हे गाव भीमरथीच्या तीरावर असल्याचा स्पष्ट उल्लेख.

५) पंडरंगेचे महाग्राम असे वर्णन करून तेथे पूर्वी वस्तीस असलेल्या 'पंडरीकमुनी' च्या मनरूपी कमळाचा विकास सुधाकर असे बिरूद लावलेल्या श्री विठ्ठलदेवास हिरीयगरंज अग्रहाराचे दान.

६) लेखामध्ये एकूण पाच कालोल्लेख, असून अगदी पहिला शक ११५९ (इ.स.१२३७) दुर्मुख संवत्सर, पौष वद्य एकादशी, उत्तरायण संक्रांत हा काळ आहे. याचा अर्थ असा नव्हे का की ज्ञानेश्वरांच्या आधी त्रेपन्न वर्षे हे विठ्ठल मंदीर, पंढरपूर तीर्थक्षेत्र व पुंडरीकमुनी यांची कीर्ति सर्वदूर (होयसाळांची राजधानी द्वारसमुद्रापर्यंत)

पसरली होती आणि यादवांच्या आधीही ते प्रतिष्ठित झाले होते.

आणखी एक लेख शक ११३५ चा असून नोंद घेण्याच्या योग्यतेचा आहे. तो शिमोगा जिल्ह्यातील शिमोगा तालुक्यात सोगाने या गावातील शिवमंदिरात आहे. होयसाळ राजा दुसरा बल्लाळ (इ.स.११७३-१२२०) याने विठ्ठलेशास भूमी दिल्याची त्यात नोंद आहे. विठ्ठलाच्या मूर्ती पंढरपूरशिवाय इतरत्रही स्थापित होऊ लागल्याचे हा लेख सुचवतो. या लेखात विठ्ठल आहे पण पुंडलिक व पंढरपूरचा उल्लेख नाही. हा बल्लाळ राजा सोमेश्वरचा आजोबा.

चौऱ्यायशीच्या लेखात पंढरपूरला, पंढरी, पांडरंपूर, पंडरीपूर, फागिनपूर, पौंडरिक क्षेत्र व पंडरग अशी पर्यायी नावे दिली आहेत. यातील पंडरंगे व पांडरंगपूर ही दोन नावे पांडरंगपल्ली या अविधेय राजाच्या पाचव्या शतकातील ताम्रपटातील नावाशी मिळती जुळती आहेत. त्यात मंदीर व दैवताचा उल्लेख नाही. दक्षिणेतील अनेक प्राचीन कोरीव लेखात पंडरंग हा शब्द शिवाला, शंकराला अथवा महादेवाला पर्यायी म्हणून आला आहे. पाचव्या शतकात तेथे एखादे महादेवाचे देऊळ असावे. म्हणूनच पंडरंगे किंवा पांडरंग म्हणजे शिवाचे. जसे वसुदेवाचा तो वासुदेव तसे पंडरंगाचे ते पांडरंग. पांडरंगपल्ली म्हणजे शंकराचे गाव. पुढे दक्षिणी पल्ली हा खेडेवजा शब्द जाऊन यादव राजा रामदेवाचे कालापर्यंत ते पाडरंगपूर झाले. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाराव्या शतकातील बार्हस्पत्यसूत्रम् या ग्रंथात 'बदरिका, सालग्राम, पुरुषोत्तम, द्वारका, बिल्वाचल, अनंत, सिंह व श्रीरंग ही नगरे वैष्णव तीर्थक्षेत्रे वर्णिलेली आहेत. त्यात पंढरपूर नाही. अर्थातच इ.सन. ११०० ते ११९९ पर्यंतच्या कालात विठ्ठलाचे संदर्भात पांडरंगपल्लीला म्हणजे पांडरंगपूरला काही महत्त्व आले नसावे हे उघड आहे.

कानडीमध्ये आजही लोकभाषेत कृष्णासाठी किट्टा, किट्टू व विष्णूसाठी विट्टू, विट्ट किंवा विठ्ठ असे शब्द वापरतात. इ.स. ११०८ ते ११५२ या काळामध्ये विष्णूवर्धन या नावाचा होयसाळ वंशात एक पराक्रमी राजा होऊन गेला. त्याच्या संदर्भात अनेक कोरीव लेखात त्याला विट्टिग व बिट्टिदेव असे संबोधले आहे. विट्टि चे विट्टी व पुढे 'विठ्ठ' असे रूप 'विष्णू'साठी पुरुषांच्या नावासाठी आणखी प्राचीन ताम्रपटात वापरली आहेत. विठ्ठ व विठ्ठपै अशी नावे उत्तर कोकणच्या शिलाहार राजांच्या सन १०४८ (शक ९७०) च्या ताम्रपटात आली आहेत.

विष्णूवर्धनचा मोठा भाऊ वीर बल्लाळ प्रथम (सन ११०० ते ११०८) व विष्णूवर्धन यानी आपल्या राज्याची सीमा भीमरथीपर्यंत वाढवल्याचा उल्लेख त्यांच्या कोरीव लेखावरून माहीत होतो. यांच्या काळातच पुंडरीक किंवा पुंडलिक त्याच्या आचार विचाराने लोकादरास पात्र झाला असावा. त्याचे वास्तव्य पांडरंगपूरासच (पूर्वीच्या पांडरंगपल्लीस) असले पाहिजे, हे सांगण्याची आवश्यकता नाही. इथेच पुंडलीकाची व विष्णूवर्धन याची गाठ पडली असावी.

शिवाचा आदर ठेऊन विष्णू (म्हणजेच विठ्ठ अथवा विठ्ठ) भक्तीची ध्वजा उंचवणारा पुंडरीक मुनीकडे विष्णू वर्धन आकर्षित झाला असल्यास नवल नाही. आजही भाविक वारकरी प्रथम शिवाच्या पिंडीचे दर्शन घेतात व मग विठ्ठूच्या दर्शनाला जात. कानडीत वात्सल्य दर्शक 'ल' प्रत्यय लागून विठ्ठचे 'विठ्ठल' रूप होते. पंढरपूरचा हा विष्णू बालकृष्ण रूपात असल्याने 'विठ्ठल', 'विठोने शिरी वाहिला देवराणा' याचा अर्थ विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग शोधायची गरज नाही.

विष्णूवर्धन पूर्वायुष्यात जैन मतानुयायी होता. रामानुजाचार्यांच्या प्रभावामुळे तो एकनिष्ठ वैष्णव बनला होता, त्यात पुंडलिकाचे साहचर्य लाभले असेल का? नक्कीच. कारण त्याच्या पुढच्या पिढ्यात खापरपणतु सोमेश्वरापर्यंत विठ्ठल उपासना परंपरा चालू ठेवली होती. कोणीही असा प्रश्न विचारील की विष्णूवर्धनच दानपत्र, दानलेख आहे का? आज तरी उपलब्ध नाही. विठ्ठलाचे संबंधित, यादव व होयसाळांचे आधीच्या राजघराण्यांचे,

कलचुरी, कल्याणी चालुक्य, मान्यखेटचे राष्ट्रकुट व बदामी इतक्यांचे शेकडो ताम्रपट आणि शिलालेख उपलब्ध आहेत. त्यात विठ्ठल, पुंडलिक व पंढरपूर यांच्याविषयी काहीही माहिती उपलब्ध नाही. त्या राजाने हे उपेक्षेने केलेले नाही. दान न देण्याचे कारण दान विषयच नव्हता.

गुप्त सम्राटां (इ. ३२० ते ४९५) पासून कल्याणी चालुक्यांपर्यंत, अनेक राजानी परम भागवत, परम वैष्णव अशी बिरुदे आपल्या नावापुढे लावली आहेत पण त्याना आधार भागवतादी पुराणांचा. द्वापारातील महापुरुषांच्या कर्तृत्वाचा, कृष्णाच्या देवत्वाचा व विदुरादी भक्तांचा. सात आठशे वर्षे ही परंपरा चालू होती. भीमरथीच्या काठी बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात पांडरंगपल्ली येथे आलेल्या पुंडलीक मुनीने दिलेला संदेश 'चरैवेति चरैवेति' वारीच्या रूपाने लोकमानसात रुजवला. विष्णूवर्धनने त्याचा आदर केला.

वारकरी पंथाचा संस्थापक हा पुंडलिक मुनी शंभर टक्के ऐतिहासिक आणि कलियुगातला आहे.

भीमरथी नदीतीरे संनिविष्ट पंडरंगे नामानं महाग्रामधिवसते

पुण्डरीकमुनि मनःकुमुद विकास सुधाकर भगवान् श्री विठ्ठलदेव

पुण्डरीकमुनि मनःकुमुद विकास सुधाकर भगवान् श्रीविठ्ठलदेव या सोळखांबी मंडपातील शिलालेखाच्या कोणा अज्ञात संस्कृत कवीच्या ओळी वारकऱ्यांनी ''पुंडलिक वरदे हारी विठ्ठल'' म्हणून शेकडो वर्षे वारीत घुमवल्या. आपण पुन्हा त्याच उच्चारून हा मागोवा इथेच थांबवूया.

(या लेखाला पोषक आणखी कोणतीही ऐतिहासिक माहिती कोणास असल्यास आवश्य कळवावी.)

**श. गो. धोपाटे**

२, साधना आदर्शनगर

ठाणे (पूर्व) - ४०० ६०३.

दूरध्वनी : २५४० १६६६

(पान क्र. ३१ वरून)

## 'श्रीरामचरित मानस' एक अद्वितीय ग्रंथ

याज्ञवल्क्य ऋषी भारद्वाज मुनींना सांगतात की ज्यावेळी एखाद्या मानवाला विधात्याच्या नियमानुसार वाईट दिवस आले तर त्याच्यावर विपरित घटना येतात. साधा धुळीचा कण मेरुपर्वता एवढा मोठा आघात करू शकतो. त्याचा पिता त्याला यमासारखा भासू शकतो किंवा दोरी ही चावणाऱ्या सापात रुपांतरीत होते.

का बरषा जब कृषी सुखाने

समय चुकें पुनि का पछताने ॥ दो. २६० चौ. २ ॥

ज्याप्रमाणे शेत सुकून गेल्यानंतर पडलेल्या पाण्याचा काही उपयोग नसतो. त्याचप्रमाणे वेळ निघून गेल्यानंतर झालेल्या पश्चातापाला काहीच अर्थ नसतो. त्याचाच अर्थ गोष्टी वेळच्या वेळीच करणे फारच योग्य आहे.

टेढ जानि सब वंदई काहू

वक्र चंद्रमही ग्रसइ न राहू ॥ दो. २८० चौ. ३ ॥

वाकड्या माणसाला सर्वजणच वंदन करतात. उदा. राहु हा वक्र चंद्रमाला ग्रहण करीत नाही. थोडक्यात सरळ माणसापेक्षा वाईट माणसाच्या वाट्याला कोणीच जात नाही.

या आणि अनेक चौपायी आणि दोहे हे बालकांडात आहे. त्यापैकी काहीचा उल्लेख मी केला. बालकांडात एकूण ३६१ चौपायी आहेत. वरील थोड्या दोहांवरून त्यांच्या अवीट गोडीचा स्वाद आपण घेतला. शितावरून भाताची परीक्षा घेणाऱ्या सुजनांना यापेक्षा अधिक काय सांगणे.

**प्राचार्य. सी. श्री. मुजुमदार**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन,

ठाणे महाविद्यालय परिसर

ठाणे - ४०० ६०१.

# परिसर वार्ता

परिसरात गेल्या महिनाभरात घडलेली सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाने आयोजित केलेली खाडी व सागरी प्रदूषणासंदर्भातील राष्ट्रीय स्तरावरील परिषद. या परिषदेची तयारी गेले अनेक दिवस चाललेली होती. दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात परिषदेचे उद्‌घाटन झाले. या विषयावर अभ्यास असणारे डॉ. उंटावले हे उद्‌घाटनासाठी उपस्थित होते. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष शिक्षणमहर्षी डॉ. वा.ना. बेडेकर होते.

परिषदेसाठी देशभरातून विविध राज्यातून अनेक प्रतिनिधी आलेले होते. या परिषदेत सादर केल्या जाणाऱ्या शोधनिबंधांचा संग्रह असणारा विशेष ग्रंथ या प्रसंगी डॉ. उंटावले यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. विशेष म्हणजे पारंपारिक पद्धतीने हे प्रकाशन न होता शिंपल्याच्या आकारात ठेवलेल्या या ग्रंथाचे शिंपले उघडून प्रकाशन करण्यात आले. खाडी व समुद्रातील वनस्पतींचा व जीव सृष्टीचा विनाश करण्यास आपणच कसे कारणीभूत असतो, याचा अंतर्मुख हेऊन विचार करायला लावणारा एल.सी.डी. वरील चौकटीच्या आधारे डॉ. उंटावले यांनी सादर केलेला शो फारच उद्बोधक होता.

यानंतर दोन दिवस विविध प्रतिनिधींनी या तांत्रिक विषयांचा विविध बाजूंवर विचार मांडणारे शोध निबंध सादर करण्यात आले.

प्राचार्य सी.जी. पाटील, उपप्राचार्या व प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सौ. माधुरी पेजावर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्राणिशास्त्र विभागाने या परिषदेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. डॉ. आठल्ये व डॉ. गोल्डिन हे परिषदेचे कार्यवाह होते तर डॉ. सौ. पेजावर नियंत्रक होत्या.

**अनुबंध**

हळू हळू आकारास येत असलेल्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचा अनुबंध वा विद्यार्थी संघाच्या अस्थायी कार्यकारिणीच्या दोन सभा गेल्या महिन्यात झाल्या. घटना बनविणे, पंजीकरण करणे व लवकरच मोठ्या कार्यक्रमाची आखणी करणे या दृष्टीने विचार विनिमय करण्यात आला.

**नाटक**

नाटकप्रेमी विद्यार्थ्यांच्या 'अल्फा' साठी असणाऱ्या तालमी ही देखील एक ठळक घटना. कला, वाणिज्य व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी यात रंगून गेले होते.

**ग्रंथालय सप्ताहानिमित्ताने व्याख्यान**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय शास्त्र पदवी व निष्णात वर्गातर्फे ग्रंथालय सेवा समूहाच्या सहयोगाने ग्रंथालय सप्ताहानिमित्ताने प्रा. वसंत साने यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथालय क्षेत्रातील विपुल अनुभव असणारे निवृत्त ग्रंथपाल प्रा. वसंत सावे यांनी यावेळी ग्रंथपालनातील आपले अनुभव यावेळी सांगितले. या केंद्राचे अभ्यासक्रम संयोजक व महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांनी प्रास्ताविक करून प्रा. सावे यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमास विर्ला महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अशोक सरदेसाईही उपस्थित होते.

ग्रंथालय सप्ताहानिमित्ताने मुंबई विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल व ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गणपुले, विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री.वि. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनीही वर्गांना भेट देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य सी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाने चालणाऱ्या पदवी वर्गाचे हे चौथे त र निष्णात वर्गाचे पहिले वर्ष आहे. डिसेंबर महिन्यात निष्णात वर्गाचे विशेष अभ्यास शिबीर घेणार असून त्यास विद्यापीठाच्या ग्रंथपाल प्रा. श्रीमती विजया राजहंस व मुक्त विद्यापीठाचे साहाय्यक ग्रंथपाल प्रा. मधुकर शेवाळे तज्ज्ञ म्हणून उपस्थित रहाणार असल्याचीमाहिती प्राचार्य सी. जी. पाटील यांनी दिली.

# पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ॥ १ ॥
जे खळांची व्यकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ॥ २ ॥
दूरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जे वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४ ॥
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलते ते अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥
किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिही लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥
आणि ग्रंथोपजीविंये । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवें जी ॥ ८ ॥
येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखया जाला ॥ ९ ॥